दैनिक
# लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

## अर्थ खाते राष्ट्रवादीलाच मिळणार!, हसन मुश्रीफांचा ठाम दावा

मुंबई दि.१७ (प्रतिनिधी)– महायुती सरकारमधील खातेवाटपाच्या चर्चांना पुन्हा वेग आला असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते तथा मंत्री हसन मुश्रीफ यांनी अर्थ खाते राष्ट्रवादी काँग्रेसलाच मिळेल, असा ठाम विश्वास व्यक्त केला आहे. त्याचबरोबर अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या कारवाईचे कौतुक करत राज्यातून मुंबईला होणाऱ्या दुधाच्या पुरवठ्यात तब्बल २५ टक्क्यांनी घट झाल्याची माहितीही त्यांनी दिली. महायुतीतील खातेवाटपाबाबत बोलताना मुश्रीफ म्हणाले, ‘‘प्रसारमाध्यमांत अनेक चर्चा सुरू आहेत. शरद पवार गटातील आमदार–खासदार एनडीएमध्ये येणार, अशा बातम्या सुरू आहेत. मात्र भविष्यात काय होणार हे लवकरच स्पष्ट होईल.‘‘ अर्थ खात्याबाबत बोलताना त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले, ‘‘अर्थ खाते निश्चितपणे राष्ट्रवादी काँग्रेसलाच मिळेल. आमच्या सर्व नेत्यांची बैठक झाली आहे. आम्ही पुन्हा अमित शहा आणि मुख्यमंत्री यांची भेट घेणार आहोत.’’ शिवसेनेच्या काही नेत्यांकडून अर्थ खाते राष्ट्रवादीकडे जाऊ नये, अशी भूमिका घेतली जात असल्याच्या चर्चांवर ते म्हणाले, ‘‘युतीमध्ये अशा प्रकारे चालत नाही. सुरुवातीला जे ठरले आहे, त्यानुसारच निर्णय व्हावा, ही आमची अपेक्षा आहे.’’ जयंत पाटील यांच्या मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या भेटीबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, ‘‘ते नगरविकास विभागाशी संबंधित एका स्थानिक विषयासाठी भेटले होते. त्यापलीकडे काय चर्चा झाली, याची माहिती आम्हाला नाही.‘‘

(वर्ष ६५ वे अंक १८३) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी–०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार, दि.१८ जुलै २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)

## सोनम वांगचुक यांचा केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यासाठी सोमवारपर्यंत उपोषण सुरु ठेवण्याचा निर्धार कायम

नवी दिल्ली दि.१७ (वृत्तसंस्था)– दिल्लीच्या जंतर मंतर येथील सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचा आज (१७ जुलै) २० वा दिवस आहे. येत्या २० जुलैपर्यंत कोणत्याही परिस्थितीत जिवंत राहण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली.वांगचुक यांनी आपल्या समर्थकांना २० जुलै रोजी संसदेवर शांततापूर्ण मोर्चा काढण्यासाठी मोठ्या संख्येने एकत्र येण्याचे आवाहन केले. लोकशाहीच्या मंदिरात आपण आपले विचार मांडू, असे ते म्हणाले. वांगचुक म्हणाले की, ते बाहेरून कमजोर असले तरी आतून खंबीर आहेत. २० जुलैचा मोर्चा यशस्वी न झाल्यास आपण भूत म्हणून परत येऊ, असेही ते गंमतीने म्हणाले.

नीट पेपरफुटी आणि परीक्षेतील अनियमिततेवरून शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी वांगचुक गेल्या २० दिवसांपासून दिल्लीच्या जंतर मंतर येथे उपोषणावर आहेत. त्यांचे वजन जवळपास ९ किलोने कमी झाले आहे. त्यांचे उपोषण आता गंभीर टप्प्यावर पोहोचले असून परिस्थिती आणखी बिघडल्यास त्यांच्या अवयवांना इजा होऊ शकते, असा इशारा डॉक्टरांनी दिला आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने प्रशासनाला त्यांच्या प्रकृतीवर दररोज लक्ष ठेवण्याचे कडक निर्देश दिले आहेत.

डॉक्टरांनी सांगितले की, दीर्घकाळच्या उपासमारीमुळे वांगचुक यांची प्रकृती खालावली असून, शारीरिक हानीचा धोका आहे. गुरुवारी, दिल्ली उच्च न्यायालयाने केंद्र आणि दिल्ली सरकारला दररोज वैद्यकीय तपासणी करण्याचे आणि गरज भासल्यास तातडीने वैद्यकीय उपचार देण्याचे निर्देश दिले.

कॉकरोच जनता पार्टी (सीजेपी) नीट पेपरफुटीच्या निषेधार्थ २० जूनपासून जंतर मंतरवर आंदोलन करत आहे. ते शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहेत. वांगचुकदेखील त्यांच्या आंदोलनात सहभागी झाले आहेत. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी बेरोजगार तरुणांची तुलना



कॉकरोचशी केल्यानंतर सीजेपीची स्थापना झाली.

यापूर्वी वांगचुक यांनी लडाखला पूर्ण राज्याचा दर्जा देण्याच्या मागणीसाठी जोधपूर तुरुंगात १७० दिवस घालवले होते. २४ सप्टेंबर २०२५ रोजी लेहमध्ये उपोषणादरम्यान हिंसाचार भडकवल्याचा त्याच्यावर आरोप ठेवण्यात आला, ज्यामुळे चार जणांचा मृत्यू झाला आणि ९० जण जखमी झाले. सरकारने वांगचुक यांच्यावर हिंसाचार भडकवल्याचा आरोप ठेवला. दोन दिवसांनंतर, २६ सप्टेंबर रोजी, त्याला राष्ट्रीय सुरक्षा कायद्या अंतर्गत ताब्यात घेऊन जोधपूर तुरुंगात पाठवण्यात आले.

## आमच्याकडून विलीनीकरणाच्या विषयावर पूर्णविराम–सुप्रिया सुळे

मुंबई दि.१७ (प्रतिनिधी)– राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घेतलेली भेट, आणि त्यानंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाबाबत राजकीय वर्तुळात सुरू असलेल्या चर्चांना आता पूर्णविराम मिळाला आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनी आज नवी दिल्लीत या संपूर्ण प्रकरणावर अत्यंत भावनिक आणि तितकीच ठाम प्रतिक्रिया दिली आहे. ‘‘माझ्या भावाची जी शेवटची इच्छा होती, त्या गोष्टीला आम्ही आता आमच्या मनात आणि संघटनेत पूर्णविराम दिला आहे. अजितदादांची इच्छा पूर्ण करण्यात त्यांच्या पक्षाला रस नाही,‘‘ अशा शब्दांत सुप्रिया सुळे यांनी पक्षाची भूमिका स्पष्ट केली.



नवी दिल्लीतील जंतरमंतर मैदानावर उपोषणाला बसलेले पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांची खासदार सुप्रिया सुळे यांनी भेट घेतली. या भेटीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी विलीनीकरणाच्या विषयावर अत्यंत संवेदनशीलपणे भाष्य केले:

सुप्रिया सुळे म्हणाल्या, ‘‘माझा भाऊ आज राहिलेला नाही. त्यामुळे माझ्या भावाबद्दल आणि तेव्हा झालेल्या चर्चेबद्दल आता आम्ही पूर्णविराम दिला आहे. माझ्या भावाला जाऊन आता पाच महिने झाले आहेत. आम्ही एक कुटुंब म्हणून या दुःखातून कुठेतरी सावरण्याचा प्रयत्न करत आहोत. दोन्ही पक्ष एकत्र यावेत आणि सर्वांनी मिळून गुण्यागोविंदाने राज्य व देशाची सेवा करावी, ही माझ्या भावाची शेवटची इच्छा होती. ती पूर्ण करण्याची आमची इच्छा दादा असतानाही होती आणि दादा गेल्यावरही होती. पण, आता समोरच्या बाजूने तशी कोणतीही भावना किंवा प्रतिसाद दिसत नाही.‘‘

अजित पवारांच्या मृत्यूनंतर समोरच्या गटाने घेतलेल्या भूमिकेबद्दल सुप्रिया सुळे यांनी तीव्र नाराजी आणि दुःख व्यक्त केले. त्या म्हणल्या, ‘‘ज्या दिवशी अजितदादांचे निधन झाले, त्या दिवशी आमच्या काही नेत्यांनी दादांची ही शेवटची इच्छा जाहीरपणे बोलून दाखवली होती. (पान ४ वर)

## वारीत निधन झाल्यास एक लाखांचं अर्थसहाय्य; श्री संत तुकाराम महाराज संस्थानचा निर्णय!

देहु दि.१७ (प्रतिनिधी)– आषाढी वारीसाठी प्रस्थान करणाऱ्या आणि पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या लाखो वारकऱ्यांसाठी एक अत्यंत महत्त्वाचा आणि दिलासादायक निर्णय समोर आला आहे. श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यादरम्यान दुर्दैवाने एखाद्या वारकऱ्याचा मृत्यू झाल्यास, त्यांच्या कायदेशीर वारसाला एक लाख रुपये इतके आर्थिक साह्य देण्याची घोषणा श्री संत तुकाराम महाराज संस्थान, देहू यांच्या वतीने करण्यात आली आहे.

पालखी सोहळ्यास सहभागी झालेल्या धाराशिवमधील मीनाबाई सत्यवान सूर्यवंशी (वय ५५ वर्षे) यांचा शुक्रवारी सकाळी ९.३० वाजता हृदयविकाराने निधन झालं. बेलवाडी या ठिकाणी रिंगण सोहळ्यादरम्यान त्यांचं निधन झालं. त्यानंतर देहू संस्थानाने वारकऱ्यांना मदतीची घोषणा केली आहे.

पालखी सोहळ्यात दरवर्षी लाखो भाविक मोठ्या श्रद्धेने आणि माउलींच्या विठू नामाच्या गजरात सहभागी होतात. या लांबच्या पायी प्रवासात अनेकदा तीव्र ऊन, पाऊस किंवा अपघाती कारणांमुळे अनुचित घटना (पान ४ वर)

## राज्यातील ९ जिल्ह्यांना यलो अलर्ट; २० जुलैनंतर मान्सून आणखी सक्रिय होण्याची शक्यता

मुंबई दि.१७ (प्रतिनिधी)– गेल्या काही दिवसांपासून दडी मारून बसलेल्या पावसाने आता पुन्हा एकदा सक्रिय होण्यास सुरुवात केली आहे. भारतीय हवामान विभागाने राज्यातील काही भागांसाठी विजांच्या कडकडाटासह पावसाचा इशारा दिला असून, पुढील दोन–तीन दिवसांत अनेक जिल्ह्यांत हलका ते मध्यम, तर काही ठिकाणी जोरदार पाऊस होण्याची शक्यता वर्तवली आहे. यामुळे पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

हवामान विभागाने नांदेड, लातूर, धाराशिव, वाशिम, नागपूर, वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. या भागांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळी वाऱ्यांसह पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. राज्यातील अनेक शहरांमध्ये सकाळपासून ढगाळ वातावरण असून, अधूनमधून पावसाच्या सरीही कोसळत आहेत. सध्या वायव्य बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले असून, बिहार, गुजरात तसेच अरबी समुद्रापासून महाराष्ट्र, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशापर्यंत कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. या हवामान प्रणालीमुळे मान्सूनला पुन्हा बळ मिळत असून, २० जुलैनंतर राज्यात पावसाचा जोर अधिक वाढण्याचा अंदाज हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. जून महिन्यात पावसाने ओढ दिल्यानंतर जुलैच्या सुरुवातीला काही भागांत चांगला पाऊस झाला. मात्र त्यानंतर पुन्हा खंड पडल्याने खरीप पिकांवर ताण वाढला आहे. अनेक भागांतील धान, सोयाबीन, कापूस आणि तूर पिकांना पाण्याची नितांत गरज असून, पाऊस लांबल्यास दुबार पेरणीचे संकट निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. १६ जुलैपर्यंत राज्यात सरासरीपेक्षा सुमारे ११ टक्के कमी पावसाची नोंद झाली आहे.

कोकण विभागात समाधानकारक पाऊस झाला असला तरी मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागांत अजूनही पावसाची मोठी तूट आहे. काही विभागांत २० ते ६० टक्क्यांपर्यंत पावसाची कमतरता नोंदवली गेली असून, धरणे आणि लहान जलस्रोतही अपेक्षेप्रमाणे भरलेले नाहीत. हवामान तज्ज्ञांच्या मते, यंदा एल निनोच्या प्रभावामुळे मान्सूनचा वेग आणि स्वरूप बदलले आहे. कोकण किनारपट्टीवर भरपूर पाऊस पडत असला तरी सह्याद्री ओलांडल्यानंतर बाष्पयुक्त वारे कमकुवत होत असल्याने मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात पावसाचे प्रमाण कमी राहिले आहे. त्यामुळे यंदा पावसाचा कालावधी आणि वितरण दोन्ही असमान राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील तीन दिवस राज्यातील काही भागांत विजांसह पावसाचा जोर कायम राहू शकतो. त्यानंतर २० जुलैपासून मान्सून अधिक सक्रिय होण्याची शक्यता आहे. या पावसामुळे खरीप पिकांना मोठा आधार मिळेल, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत असले तरी दमदार प्रतीक्षा अद्याप कायम आहे.

## शेअर बाजारात जोरदार तेजी; सेन्सेक्स ९६५ अंकांनी वधारला, निफ्टी २४,३०० पार

मुंबई दि.१७ (प्रतिनिधी)– आठवड्याच्या शेवटच्या व्यवहार दिवशी भारतीय शेअर बाजारात जोरदार तेजी पाहायला मिळाली. लार्जकॅप शेअर्समध्ये झालेल्या दमदार खरेदीमुळे प्रमुख निर्देशांक मोठ्या वाढीसह बंद झाले. बीएसई सेन्सेक्स ९६४.५८ अंकांनी वधारून ७८,१५१.४९ अंकांवर बंद झाला. तर एनएसई निफ्टी २६१.५५ अंकांच्या वाढीसह २४,३३४.३० अंकांवर पोहोचला.

दिवसभर बाजारात खरेदीचा जोर कायम होता. विशेषतः आयटी, बँकिंग आणि ऑटो क्षेत्रातील शेअर्समध्ये झालेल्या खरेदीने बाजाराच्या तेजीला मोठा आधार दिला. सकाळी सकारात्मक सुरुवात झाल्यानंतर प्रमुख निर्देशांकांनी दिवसभर आपली आघाडी कायम ठेवली.

आजच्या व्यवहारात खासगी बँका आणि आयटी क्षेत्राने बाजारातील तेजीचे नेतृत्व केले. निफ्टी प्रायव्हेट बँक इंडेक्स जवळपास २ टक्क्यांनी वधारला, तर निफ्टी बँक इंडेक्समध्ये सुमारे १.६ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली.

## सोनम वांगचुक यांच्या आंदोलनावर तोडगा निघायला हवा–संजय शिरसाट

छत्रपती संभाजीनगर दि.१७ (प्रतिनिधी)– दिल्लीत सुरू असलेल्या सोनम वांगचुक यांच्या उपोषणाला रविवारी २० दिवस पूर्ण होत आहेत. त्यांची प्रकृती ढासळत असल्याने आता राज्याच्या राजकीय वर्तुळातूनही प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. शिवसेना (शिंदे गट) नेते आणि आमदार संजय शिरसाट यांनी आज (शुक्रवारी) पत्रकार परिषदेत बोलताना सोनम वांगचुक यांच्या आंदोलनावर तोडगा निघाला पाहिजे, अशी आपल्या पक्षाची अधिकृत भूमिका मांडली. याचबरोबर, त्यांनी उद्धव ठाकरे यांच्या रामरक्षा आंदोलनावरूनही जोरदार टोलेबाजी केली.

सोनम वांगचुक यांच्या सुरू असलेल्या उपोषणाबाबत बोलताना शिरसाट म्हणाले, ‘‘सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचा आज २०वा दिवस असून त्यांची तब्येत खालावली आहे. उच्च न्यायालयानेही सरकारला काही सूचना दिल्या आहेत. या आंदोलनातून लवकरात लवकर काहीतरी सकारात्मक तोडगा निघाला पाहिजे, हीच आमच्या पक्षाची अधिकृत भूमिका आहे. केंद्राने यात हस्तक्षेप करून हे उपोषण थांबवावे, कारण त्यांची प्रकृती खराब होणे योग्य नाही.‘‘

अयोध्येतील राम मंदिराच्या देणगीपेटीत झालेल्या कथित भ्रष्टाचाराच्या विरोधात उद्धव ठाकरे आज नागपुरात रामरक्षा पठण आंदोलन करणार आहेत. यावर शिरसाट यांनी खोचक टीका केली. ‘‘उद्धव ठाकरेंना आता रामाची आणि हनुमानाची आठवण झाली आहे, ते भक्ती रसात लीन होत आहेत ही आनंदाची गोष्ट आहे, आमच्या त्यांना शुभेच्छा आहेत. मात्र, नवनीत राणांनी जेव्हा हनुमान चालिसा वाचण्याचा प्रयत्न केला होता, तेव्हा त्यांना तुरुंगात टाकले होते. हे सरकार त्यांच्या आरतीला अडवणार नाही, त्यांनी अत्यंत भक्तिभावाने आरती करावी,‘‘ असा चिमटा त्यांनी काढला. तसेच, हे आंदोलन म्हणजे केवळ संजय राऊत यांचे फुकटचे सल्ले असल्याचा दावाही त्यांनी केला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) नेते जयंत पाटील यांच्यात झालेल्या (पान ४ वर )

## मोदी वांगचुक यांच्या उपोषणाची दखल घेत नाहीत, धर्मेंद्र प्रधानांनी राजीनामा का दिला नाही? हा मूळ मुद्दा–हर्षवर्धन सपकाळ

मुंबई दिद.१७ (प्रतिनिधी)– महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेतली. यावेळी सपकाळ यांनी विविध मुद्यांवर भाष्य केलं. नीटचा पेपर पहिल्यांदा फुटलेला नाही, यापूर्वी ७० पेपर फुटलेले आहेत. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणी जोरदार पद्धतीनं केली आहे. सोनम वांगचुक पहिल्यांदा उपोषणाला बसलेले नाहीत. ते यापूर्वी लडाखच्या भूमिपुत्रांना न्याय मिळावा आणि त्यांचे अधिकार अबाधित ठेवावेत यासाठी ते उपोषणाला बसले होते. लडाखच्या स्थानिकांच्या अधिकारासाठी ते मागणी करत होते.

सोनम वांगचुक उपोषणाला बसले आहेत, काँग्रेस नेते आज तिथे गेले असले तरी आमचे आणि त्यांचे मुद्दे एक आहेत. मूळ मुद्दा हा आहे नरेंद्र मोदी का गेले नाहीत, मोदींनी का दखल घेतली नाही? मूळ मुद्दा मंत्र्यांनी राजीनामा का दिला नाही हे आपण विचारायला तयार नाही, असं हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं. मूळ मुद्दा धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला पाहिजे आणि या उपोषणाची दखल नरेंद्र मोदी का घेत नाहीत, असा असल्याचं हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं आहे.

रामाच्या मंदिरात चोरी झालीय हे मोठ्या प्रमाणावर झालं आहे. चोरी करणारे राष्ट्रीय स्वयंसेवक (पान ४ वर)

## कामासाठी मुख्यमंत्र्यांकडे नाही तर काय मग सरन्यायाधीशांकडे जायचे?– विजय वडेट्टीवार

नागपूर दि.१७ (प्रतिनिधी)– राज्यातील जनतेसमोर पिण्याचे पाण्याची मोठी समस्या उभी राहणार आहे. वर्ध्यात १२ वर्षांच्या मुलीची हत्या करण्यात आली तिच्यावर अत्यचार झाल्याचे समोर आले, अशा घटना रोज घडत आहेत. राज्यात कायदा सुवव्यस्था राहिलेली नाही. पण आपण आरोप–प्रत्यारोप आणि सत्तेवर चर्चा करत आहोत. काही मंत्री देवाच्या दर्शनाला जातात आणि फडणवीस दिल्लीत गेले तर आमच्या वहिनींना महाराष्ट्राचे नेतृत्व मिळू दे अशी इच्छा व्यक्त करतात, देवाकडे जाताय तिथे खूर्ची मागत आहेत,



महाराष्ट्रासाठी, बेरोजगारांसाठी शेतकऱ्यांसाठी चांगले दिवस मागत नाहीत. नालायक लेकाचे लोकं महाराष्ट्र संकटात असताना काय मागतात त्यांना लाज सुद्धा वाटत नाही, असा टोला दत्तात्रय भरणे यांचे नाव न घेता काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी लगावला आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, गुजराती जोडी देशात कोणाला सत्तेत घ्यायचे आणि कुणाला नाही हे ठरवते. दोन जण देश चालवत आहेत आणि दोन जण देशाची संपत्ती लुटण्याचे काम करत आहेत. आम्हाला देशामध्ये वाढणारी महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या समस्या, लोकशाही टिकेल का नाही, अशा मुद्द्यांची चिंता आहे. कोणाला सत्तेत घेणार हे महत्त्वाचे नाही.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, मी जर उद्या माझ्या मतदारसंघातील कामासंदर्भात मुख्यमंत्र्यांची भेट घेतली तर त्यांचा असा (पान ४ वर)

## संभाजीनगर–इचलकरंजी बसला भीषण आग:चालकाच्या प्रसंगावधानामुळे ३८ प्रवाशांची सुखरूप सुटका

छत्रपती संभाजीनगर दि.१७ (प्रतिनिधी)– छत्रपती संभाजीनगरइचलकरंजी एसटी बसला शुक्रवारी सकाळी भीषण आग लागल्याची घटना घडली. बसमध्ये ३८ प्रवासी प्रवास करत होते. मात्र चालकाचे प्रसंगावधान आणि बाजूने जाणाऱ्या कारमधील नागरिकांच्या सतर्कतेमुळे सर्व प्रवाशांना वेळेत बसमधून बाहेर काढण्यात यश आले. त्यामुळे मोठी जीवितहानी टळली.

ही घटना छत्रपती संभाजीनगर–बीड महामार्गावरील पिंपळगाव पांढरी फाटा परिसरात, गोदावरी हॉटेलजवळ सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास घडली. सकाळी ८ वाजता छत्रपती संभाजीनगरहून इचलकरंजीकडे निघालेली एसटी बस पंढरपूरच्या वारीसाठी जाणाऱ्या वारकऱ्यांसह प्रवाशांना घेऊन जात होती.

बसच्या मागून कारने प्रवास करणारे श्रीगोंदा येथील प्राचार्य अमोल नागवडे आणि त्यांच्यासोबत विघ्ने दिलीप, गणेश शितोळे व वैभव पवार यांनी बसच्या खालून धूर आणि आगीच्या ज्वाळा निघताना पाहिल्या. त्यांनी तत्काळ बसला ओव्हरटेक करून चालकाला बसला आग लागल्याची माहिती दिली.

यावेळी चालकाने कोणतीही घाबरगुंडी न उडवता बस तातडीने रस्त्याच्या कडेला थांबवली. चालक, वाहक आणि प्रवाशांच्या सहकार्याने अवघ्या काही क्षणांत सर्व ३८ प्रवाशांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले.

प्रवासी खाली उतरल्यानंतर अवघ्या पाच मिनिटांत आगीने रौद्ररूप धारण केले आणि संपूर्ण बस आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. काही वेळातच बस पूर्णपणे जळून खाक झाली. बस पेटल्याचे दृश्य पाहून परिसरात एकच खळबळ उडाली.

या बसमधील काही प्रवासी पंढरपूरच्या आषाढी वारीसाठी निघाले होते. (पान ४ वर)

## सतेज पाटील यांचा महायुती सरकारवर हल्लाबोल

कोल्हापूर दि.१७ (प्रतिनिधी)– आजचा कठीण काळ निघून जाऊन २०१९ साली जाण राज्याच्या राजकारणात निश्चितपणे बदल होईल याची आम्हा सगळ्याना पूर्ण खात्री असल्याने सगळेजण ताकतीने एकत्र राहू. जयंत पाटील हे शाहू, फुले, आंबेडकर यांचा विचार, यशवंतराव चव्हाण यांचा राजकीय सामाजिक वारसा घेऊन पुढे जाणारे नेते असल्याने महायुतीसोबत जाण्याचा कोणताही निर्णय घेणार नाहीत. ते आमच्या सोबत राहतील याची खात्री आहे, असा विश्वास काँग्रेसचे विधान परिषदेचे गटनेते सतेज पाटील यांनी येथे व्यक्त केला.

शुक्रवारी पत्रकारांशी संवाद साधताना ते म्हणाले की, नीट परीक्षा घोटाळ्या बाबत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी विद्यार्थी आंदोलनात आवाज उठवला आहे. याच प्रश्नासाठी सोनम वांगचुक यांचे १९ व्या दिवशीही आंदोलन सुरू आहे. जीव गेला तरी चालेल पण लक्ष द्यायचे नाही ही केंद्र सरकारची भूमिका चुकीची आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतल्याने आकाश कोसळणार नाही.

राज्याला स्वतंत्र गृहमंत्र्याची गरज असल्याचे मी यापूर्वीही सांगितलेले होते. मुख्यमंत्र्यांकडे असणारे हे (पान ४ वर)

## मी घरासाठी सून आणायला गेलो होतो, पणं मुलगाच गमावला; केतन अग्रवालच्या वडिलांचा अश्रूंचा बांध फुटला!

पुणे दि.१७ (प्रतिनिधी)– पुणे जिल्ह्यातील लोहगड येथील केतन अग्रवाल हत्या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी सिया गोयल आणि चेतन चौधरी यांच्या न्यायालयीन कोठडीत १४ दिवसांची वाढ करण्यात आली आहे. याप्रकरणी काल (१६ जुलै) वडगाव मावळ न्यायालयात व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सुनावणी घेण्यात आली. यावेळी न्यायालयाने दोन्ही आरोपींना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणावर आज केतनच्या वडिलांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी आपल्या एकुलत्या एक मुलाच्या आठवणीने आणि त्याच्यावर झालेल्या अन्यायावर बोलताना केतनच्या वडिलांचे अश्रू अनावर झाले.

केतनचे वडील म्हणाले की, ‘‘हे दुःख आमच्यासाठी समुद्रापेक्षा मोठे आहे. मी तर आपल्या मुलाचे लग्न करायला निघालो होतो, ते तर झाले नाही. परंतु माझ्या घरी इतके मोठे दुःख आले आहे की, आज माझा मुलगा देखील राहिला नाही आणि माझे वडील देखील राहिले नाहीत. प्रत्येक मनुष्य हे स्वप्न बघतो की आपला मुलगा आपल्याला म्हातारपणी सांभाळेल, ते आज काहीच राहिलेले नाही. मला एकच मुलगा होता, तो देखील गेला. हे दुःख मी जिवंत आहे तोपर्यंत तरी कमी होऊ शकत नाही, असे त्यांनी म्हटले.

लग्न ठरवताना मध्यस्थ कोण होते? याबाबत विचारले असता केतनचे वडील म्हणाले की, ‘‘हे लग्न माझे सख्खे चुलत मामा आणि मामी नरेंद्र जगन्नाथ मित्तल आणि रेणू नरेंद्र मित्तल यांनी जुळवून दिले होते. त्यांनी मला पूर्ण विश्वास दिला होता की, ही मुलगी (पान ४ वर)

# जनसामान्यांचे कैवारी- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे

समाजाची सुख दु:ख जानणारे, समाजातील तळागाळातील लोकांच्या व्यथांना सर्वांसमोर सादर करणारे, दीन दुबळ्यांना न्याय मिळवून देणारे फार थोडे असतात. अशा या थोड्या जाणकारात साहित्य महर्षी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा क्रमांक १ वर आहे. अण्णाभाऊ साठे म्हणजे गोरगरीब, दीन, दुबळे, मागासवर्गीय यांचे कैवारी होते. त्यांनी या सर्व सामान्यांसाठी आपल्या लेखणीच्या माध्यमातून त्यांच्या व्यथा, कथा, प्रत्यक्ष जीवन चित्र सर्वांसमोर मांडले.

महाराष्ट्राच्या स्फूर्ती गीतातून अण्णाभाऊंनी राज्यात भांडवलदारापासून मुक्त करण्यासाठी शेतकऱ्यांना व कामगारांना आपली कंबर बांधून लढण्याची प्रेरणा दिली. तसेच ही पृथ्वी शेषनागाच्या शिरावर नसून कामगारांच्या हातावर आहे हा संदेशही अण्णाभाऊंनी दिला. अशा या थोर समाज व्यथा जाणकाराचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे झाला. अण्णाभाऊंचे बालपण अत्यंत हलाखीत गेले. त्या काळी वाटेगाव औंध संस्थानात होते. दलीत शोषितांच्या वाट्याला प्रचंड दारिद्र्य होते. त्यामुळे त्यांच्यावर अनेकदा उपासमारीची वेळ येत होती. चार लेकराच्या तोंडात दोन वेळेचा घास घालणे अत्यंत अवघड झाले होते. केवळ साठे परिवाराची नव्हे तर मातंग समाजाच्या शंभरावर झोपड्या होत्या. त्या प्रत्येक झोपडीला भूक, रोगराई, दारिद्र्य, दुष्काळ, अज्ञान आणि अंधश्रद्धेने ग्रासलेले होते. ब्रिटीशांनी मातंग जमातीचा कायदा केला होता. कुठे काही गुन्हा घडला की, पहिल्यांदा या झोपड्याची झडती घेण्यात येत होती. गावाच्या श्रीमंत मंडळीचा रोषही या वस्तीवरच असायचा अधूनम धून या वस्तीवर त्यांचे हल्लेही व्हायचे अशा विषम परिस्थितीत अण्णा मोठे होऊ लागले. अण्णा भाऊंना प्राथमिक शिक्षणासाठी शाळेत दाखल करण्यात आले. मात्र उच्च वर्णीयांची मिरासदारी असलेले शिक्षण अण्णाभाऊच्या मनाला भावले नाही. केवळ दीड दिवस शाळेत जाऊन त्यांनी या भेदभावांच्या शिक्षणाला नाकारले. अण्णाभाऊंनी वाटेगावच्या दलितांच्या व्यथा न्याहाळल्या होत्या ते ११ वर्षाचे असताना त्यांनी वाटेगाव सोडले. कारण वाटेगावात अस्पृश्यता मोठ्या प्रमाणात पाळल्या जात होती. दलितांचे शोषण मोठ्या प्रमाणात होत होते. अण्णाभाऊंचे कुटुंब मुंबईला चालत आले व तेथेच स्थायीक झाले.

मुंबईला आल्यावर अण्णाभाऊंना कसले शिक्षण त्यांनी आपल्या कुटुंबीयांसोबत हमालीचे काम सुरू केले. झाडूवाला व फ रीवाल्यांची गाठोडी डोक्यावरून व पाठीवरून नेण्याचे काम त्यांनी केले व पोट भरू लागले. अण्णासाठी कसली शाळा? आणि कसले शिक्षण? मात्र हमालीचे काम करीत असताना अण्णाभाऊ साठे रस्त्यावर लावलेले दुकानाचे नामफलक वाचू लागले. सिनेमांचे पोस्टर्स व त्यावरील नाव वाचू लागले. रस्त्यावरील विविध बोर्ड वाचून त्यांनी आपली वाचनाची भूक वाढविली. हळूहळू ते चांगल्या प्रकारे वाचू लागले. लिहू लागले, आपणही वाचू लिहू शकतो असे त्यांचा वाटायला लागल्यावर त्यांचा आत्मविश्वास उंचावला व त्यांनी वाचनाचा सपाटा चालविला. वर्तमानपत्र पुस्तके ते वाचू लागले प्रचंड चिंतन व मनन यातूनच अण्णाभाऊंचे शिक्षण पूर्णत्वास गेले आणि ते लिहूही लागले. यातूनच अण्णाभाऊंच्या साहित्याची निर्मिती झाली.

बालवयात अण्णांनी कल्याण येथे आपल्या वडिलांसोबत कोळसा भरण्याचे काम केले कापडाचे गठ्ठे पाठीवर उचलून ते वाहून नेण्याचे कामही केले. मोरगाव गिरणीत झाडूवाल्यांचे काम केले बापू साठेच्या तमाशात नाचले. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य वाचले की, समजते अण्णा साठे हे या विश्वातील कष्टकऱ्यांचे, पीडीतांचे दीन दुबळ्यांचे, शोषीतांचे खरे प्रतिनिधी होते. अण्णांनी आपल्या साहित्यात समाजाचे वास्तव चित्र लिहिलेले आहे. आपल्या लिखाणातून त्यांनी भटक्या विमुक्तांचे जीवन वर्णन केलेले आहे. त्यांची भूक, गावकुसा बाहेरील त्यांची जीवन शैली, पोलीस पाटील, सरपंच यांच्याकडून होणारे अन्याय, होणारे अत्याचार अवहेलना या सर्वांचे वर्णन केलेले आहे. हे वर्णन वास्तववादी आहे, अण्णाभाऊंनी आपल्या साहित्य कृतीतून वास्तववादी चित्रण करून ते समाजासमोर व राज्यकर्त्यांसमोर आणले. या त्यांच्या सामाजिक बांधीलकीच्या लिखाणातून त्यांचे तत्कालीन समाजा बाबतचे प्रेम व दलिताविषयींची, दीन दुबळ्यांची, सामाजिक बांधिलकी निदर्शनाला येते.शेकडो वर्षाच्या इतिहासात संस्कृतीच्या मिरासदारांनी जे दडवून ठेवण्याचा प्रयत्न केला होता तो प्रकाशात आणण्याचे काम क्रांतीकारी ज्योतीबा फुले, डॉ. आंबेडकर, मॅक्झिम गार्की यांची प्रेरणा घेऊन अण्णाभाऊच्या रूपात जगाच्या वेशीवर जग जाहीर अवतरले. अण्णाभाऊ साठेंनी समाज परिपूर्णपणे उभा करण्याचा प्रयत्न केला : अण्णाभाऊ साठे ज्या समाजात जन्मले त्या समाजाला परिपूर्ण उभे करण्याचे काम त्यांनी केले. यासाठी त्यांनी आपल्या लेखणीचा आधार घेतला. समाजाच्या सुख दु:खात ते समरस झाले. त्यांच्या व्यथा जाणून त्या जगासमोर ठेवण्याचा त्यांनी अथक प्रयत्न केला. त्यांच्या लिखाणाचे विषय म्हणजे त्यांच्या भोवतीचा दिनदुबळा, गोरगरीब व दलित समाज होय. मजूर, कामगार, खाटीक, वेश्या, वेश्याचे दलाल, नाचणारी स्त्री, भिकारी, गुंड, दारूवाले, खुनी दरोडेखोर, नंदी बैलवाले, डोंबारी, फासे पारधी, गारूडी, माकडवाले, बहुरूपी ही सर्व माणसे व त्यांचा व्यवसाय त्यांच्या व्यथा या अण्णांच्या लेखनांचा विषय झाली आणि अण्णांनी परिपूर्ण लिखान करून या माणसाच्या कथा जगासमोर मांडल्या. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे राज्याच्या सामाजिक जडणघडणीत महत्त्वाचे योगदान आहे. अण्णांच्या अनेक कादंबऱ्यावर आधारित सिनेमा चित्रित झालेले आहेत. पोवाडे, कविता, यातून राज्याच्या अस्मितेची व गौरवाची स्तुती त्यांनी वर्णन केलेली आहे. अण्णाभाऊ यांनी आपल्या लिखाणातून माणूस सतत जपला आहे. माणुसकीची जपवणूक केलेली आहे. ‘जगा आणि जगू द्या’ ही विचारसरणी त्यांनी शेवटपर्यंत जपलेली आहे. नितीमत्ता, प्रामाणिकता हे अण्णाभाऊंच्या जिव्हाळ्याचे विषय होते. ‘चारित्र्य व शील’ ही त्यांच्या स्त्री पात्रचे मौलिक विषय होते. संयुक्त महाराष्टाच्या चळवळीत अण्णाभाऊ साठे यांचे मोठे योगदान आहे. विपुल वास्तवादी लिखान- अनेक कादंबऱ्या कथा संग्रह, लोकनाट्य, नाटके, पोवाडे, शाहिरी चित्रपट कथा, माझा रशियाचा प्रवास अशी विपुल प्रमाणात साहित्य निर्मिती अण्णाभाऊ साठे यांनी केली. तळागाळातला वर्ग अण्णांच्या लिखानाचा विषय बनला होता. भारताच्या अन्यायग्रस्त समाजाची ओळख अण्णाभाऊंच्या लेखणीमुळे जगाला झाली. कामगार चळवळीतून त्यांच्या लिखाणाला प्रारंभ झाला होता. जनसामान्यांचा कैवारी असलेले अण्णाभाऊ साठे १८ जुलै १९६९ रोजी पंचतत्वात विलीन झाले. ‘अरे माझे मानधन तर मला द्या’ हे त्यांचे शेवटचे शब्द अशा या जन सामान्यांचे कैवारी असलेल्या अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या स्मृतींना कोटी कोटी प्रणाम..

# अण्णाभाऊ साठे : समतेचा ज्वलंत आवाज

**१८ जुलै** हा दिवस महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक इतिहासात अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या दिवशी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा स्मृतिदिन पाळला जातो. हा दिवस केवळ एका साहित्यिकाच्या स्मरणाचा नसून समाजातील वंचित, पीडित, श्रमिक आणि उपेक्षित घटकांच्या अस्मितेला शब्द देणाऱ्या एका महान लोककलावंताला अभिवादन करण्याचा दिवस आहे. आपल्या लेखणीतून, शाहिरीतून आणि लोककलेतून जनसामान्यांच्या वेदना, संघर्ष, स्वाभिमान आणि समतेचा संदेश देणारे अण्णाभाऊ साठे हे मराठी साहित्यविश्वातील एक अद्वितीय व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी साहित्याला केवळ मनोरंजनाचे साधन न म ानता सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम बनविले. त्यांच्या प्रत्येक साहित्यकृतीत जीवनाचा खरा स्पर्श, श्रमिकांचे वास्तव, अन्यायाविरुद्धचा विद्रोह आणि समतेची प्रखर जाणीव आढळते. म्हणूनच त्यांचे कार्य आजही समाजाला दिशा देणारे आणि प्रेरणा देणारे ठरते.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव येथे मातंग समाजातील एका अत्यंत गरीब कुटुंबात झाला. त्यांचे मूळ नाव तुकाराम भाऊराव साठे असे होते. घरची अत्यंत हलाखीची आर्थिक परिस्थिती, सामाजिक उपेक्षा आणि जातीय अन्याय यांचा अनुभव त्यांनी बालपणापासून घेतला. औपचारिक शिक्षण घेण्याची संधी त्यांना फारशी मिळाली नाही. परिस्थितीमुळे त्यांचे शिक्षण अल्पावधीतच थांबले. परंतु जीवन हीच त्यांची सर्वात मोठी शाळा ठरली. प्रत्यक्ष जीवनातील अनुभव, लोकजीवनाचे निरीक्षण, कष्टकरी समाजाचे दुःख आणि अन्यायाची जाणीव यांमधून त्यांनी स्वतःला घडविले. पुढे उदरनिर्वाहासाठी त्यांचे कुटुंब मुंबईत आले. त्या काळात मुंबई वेगाने औद्योगिक शहर म्हणून विकसित होत होती. गिरण्या, कारखाने आणि झोपडपट्ट्यांतील कठीण जीवन त्यांनी जवळून अनुभवले. याच अनुभवांनी त्यांच्या साहित्याला वास्तवाची ताकद दिली.

मुंबईतील जीवन हे त्यांच्या आयुष्यातील निर्णायक वळण ठरले. त्यांनी अनेक प्रकारची श्रम ाची कामे केली. कधी हमाली, कधी बांधकामावरील मजुरी, तर कधी रस्त्यावर छोटीमोठी कामे करून त्यांनी कुटुंबाचा उदरनिर्वाह केला. श्रमाची प्रतिष्ठा आणि कष्टकरी माणसाच्या जीवनातील संघर्ष त्यांनी स्वतः अनुभवला असल्यामुळे त्यांच्या लेखणीत कृत्रिमता नव्हती. त्यांच्या साहित्यामध्ये श्रमिक वर्गाचे जीवन अत्यंत जिवंतपणे उभे राहते. त्यांनी गरीब माणसाला दयेचा विषय न बनविता स्वाभिम ानी आणि संघर्षशील व्यक्ती म्हणून साकारले. अण्णाभाऊ साठे यांच्यावर महात्मा ज्योतिराव फ ुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतावादी विचारांचा खोल प्रभाव होता. समाजातील विषमता, जातिभेद, आर्थिक शोषण आणि सामाजिक अन्याय याविरुद्ध त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून सातत्याने आवाज उठविला. त्यांच्या मते साहित्य हे जनतेच्या जीवनाशी जोडलेले असले पाहिजे. समाजातील वास्तवापासून दूर असलेले साहित्य फार काळ टिकत नाही. म्हणून त्यांनी लोकभाषा, लोकसंस्कृती आणि लोकजीवन यांना आपल्या साहित्याचा केंद्रबिंदू बनविले.

अण्णाभाऊ साठे हे केवळ साहित्यिक नव्हते, तर ते एक प्रभावी लोकशाहीर होते. त्यांनी पोवाडे, लावण्या, लोकनाट्य, वगनाट्य आणि शाहिरीच्या माध्यमातून सामाजिक जागृती घडवून आणली. त्यांच्या आवाजात जनतेच्या वेदना होत्या आणि त्यांच्या शब्दांत परिवर्तनाची ताकद होती. त्यांनी कलाकृतींना सामाजिक जबाबदारीची जोड दिली. त्यांच्या शाहिरीने हजारो कामगार, शेतकरी आणि सामान्य लोकांमध्ये स्वाभिमानाची भावना जागृत केली. त्यांच्या कार्यक्रमांना प्रचंड प्रतिसाद मिळत असे, कारण ते लोकांच्या मनातील भावना त्यांच्या भाषेत मांडत असत.



मराठी साहित्यामध्ये अण्णाभाऊ साठे यांचे योगदान अत्यंत उल्लेखनीय आहे. त्यांनी तीसपेक्षा अधिक कादंबऱ्या, अनेक कथासंग्रह, पोवाडे, लावण्या, वगनाट्ये, प्रवासवर्णने आणि विविध प्रकारचे साहित्य निर्माण केले. त्यांच्या साहित्यामध्ये कल्पनारम्यता नसून जीवनाचे वास्तव आहे. त्यांनी सम ाजातील सर्वसामान्य म ाणसाचे जीवन केंद्रस्थानी ठेवले. त्यांच्या लेखनात अन्यायाविरुद्धचा संघर्ष, मानवी प्रतिष्ठा, सामाजिक समता, स्त्रियांचे प्रश्न, कामगारांचे जीवन, ग्रामीण वास्तव आणि दलित समाजाचे अनुभव प्रभावीपणे व्यक्त झाले आहेत.

त्यांची 'फकिरा' ही कादंबरी मराठी साहित्यातील मैलाचा दगड मानली जाते. या कादंबरीतील नायक फकिरा हा अन्यायाविरुद्ध लढणारा, स्वाभिमानी आणि समाजासाठी झटणारा व्यक्ती आहे. ही कादंबरी केवळ एका व्यक्तीची कथा नसून शोषित समाजाच्या सामूहिक संघर्षाचे प्रतीक आहे. या साहित्यकृतीला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वायय पुरस्कार प्राप्त झाला. आजही 'फकिरा' ही सामाजिक न्याय, मानवी प्रतिष्ठा आणि संघर्षाची प्रेरणादायी कादंबरी म्हणून अभ्यासली जाते.

अण्णाभाऊ साठे यांच्या कथांमध्येही सम ाजातील वास्तव अत्यंत प्रभावीपणे व्यक्त झाले आहे. झोपडपट्ट्यांतील जीवन, दारिद्र्य, बेरोजगारी, श्रमि कांचे प्रश्न, स्त्रियांचे दुःख, सामाजिक विषमता आणि मानवी नातेसंबंध यांचे त्यांनी अत्यंत संवेदनशील चित्रण केले. त्यांच्या कथांमधील पात्रे काल्पनिक वाटत नाहीत, तर ती आपल्या समाजातीलच माणसे वाटतात. त्यांच्या भाषेत कृत्रिम अलंकारिकता नसून सहजता आणि लोकभाषेची ताकद आहे. त्यामुळे त्यांचे साहित्य सर्वसामान्य वाचकांपर्यंत सहज पोहोचले.

स्त्रीजीवनाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोनही अत्यंत प्रगतिशील होता. समाजातील स्त्रियांचे शोषण, आर्थिक असुरक्षितता, सामाजिक अन्याय आणि त्यांची संघर्षशील वृत्ती त्यांनी अत्यंत वास्तववादी पद्धतीने मांडली. त्यांच्या साहित्यामधील स्त्री ही केवळ दुःख भोगणारी व्यक्ती नसून संकटांना धैर्याने सामोरी जाणारी आणि आत्मसन्मानाने जगणारी व्यक्ती आहे. स्त्री-पुरुष समानतेचा विचार त्यांनी प्रत्यक्ष जीवनातील उदाहरणांमधून मांडला. संयुक्त म हाराष्ट्र चळवळीत अण्णाभाऊ साठे यांनी शाहिरीच्या माध्यमातून मोठे योगदान दिले. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी जनजागृती करण्यामध्ये त्यांच्या पोवाड्यांनी आणि लोकगीतांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या शब्दांनी जनतेमध्ये उत्साह, आत्मविश्वास आणि लढाऊ वृत्ती निर्माण केली. मराठी अस्मिता, सांस्कृतिक ओळख आणि सामाजिक ऐक्य यांना बळकटी देण्याचे कार्य त्यांच्या साहित्याने केले. कामगार चळवळीशी त्यांचे नाते अत्यंत जवळचे होते. मुंबईतील गिरणी कामगार, बांधकाम मजूर, हातावर पोट असलेले श्रमिक आणि स्थलांतरित कामगार यांच्या प्रश्नांना त्यांनी आपल्या साहित्याचा विषय बनविले. श्रमाला प्रतिष्ठा मिळाली पाहिजे, प्रत्येक माणसाला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे आणि समाजातील संपत्तीवर सर्वांचा समान हक्क आहे, हा विचार त्यांच्या लेखनातून सातत्याने व्यक्त झाला. त्यामुळे त्यांचे साहित्य केवळ साहित्यिक न राहता सामाजिक चळवळीचे प्रभावी साधन बनले.

अण्णाभाऊ साठे यांनी लोककलेला सामाजिक परिवर्तनाचे माध्यम बनविले. तमाशा, पोवाडा आणि लोकनाट्य यांसारख्या लोककला प्रकारांना त्यांनी नवे सामाजिक भान दिले. पूर्वी केवळ मनोरंजनासाठी वापरल्या जाणाऱ्या या कलाप्रकारांद्वारे त्यांनी सम ाजातील अन्याय, विषमता आणि शोषणाविरुद्ध प्रभावी संदेश दिला. त्यामुळे लोककलेला सामाजिक बांधिलकीची नवी दिशा मिळाली. त्यांच्या साहित्यामध्ये राष्ट्रप्रेम आणि मानवतावाद यांचाही प्रभाव दिसून येतो. भारतातील विविध जाती, धर्म आणि भाषांमधील लोकांनी परस्पर सन्मान, बंधुता आणि समतेच्या भावनेने जगले पाहिजे, हा त्यांचा ठाम विचार होता. त्यांनी कोणत्याही प्रकारच्या द्वेषाला किंवा भेदभावाला कधीही पाठिंबा दिला नाही. मानवतेचे मूल्य हेच सर्वश्रेष्ठ असल्याचा संदेश त्यांनी सातत्याने दिला.

अण्णाभाऊ साठे यांना सोव्हिएत रशियाला भेट देण्याची संधी मिळाली होती. त्या प्रवासामुळे त्यांची दृष्टी अधिक व्यापक झाली. त्यांनी तेथील सामाजिक व्यवस्था, श्रमिकांचे जीवन आणि विकास यांचा अभ्यास करून प्रवासवर्णनही लिहिले. त्यांच्या साहित्यामध्ये जागतिक मानवतावादी दृष्टिकोन आणि श्रमिकांविषयीची आंतरराष्ट्रीय एकात्मतेची भावना दिसून येते. आजच्या काळात अण्णाभाऊ साठे यांचे विचार अधिकच महत्त्वाचे वाटतात. आर्थिक विषमता, बेरोजगारी, सामाजिक भेदभाव, स्थलांतर, असंघटित कामगारांचे प्रश्न, स्त्रियांची सुरक्षितता आणि सामाजिक न्याय यांसारख्या समस्या आजही समाजासमोर आहेत. अशा वेळी समता, बंधुता, श्रमप्रतिष्ठा आणि मानवी सन्मान यांचा त्यांनी दिलेला संदेश अत्यंत समकालीन ठरतो. त्यांच्या साहित्याचा अभ्यास केल्यास समाजातील दुर्बल घटकांविषयी संवेदनशीलता निर्माण होते आणि लोकशाही म ूल्यांवरील विश्वास अधिक दृढ होतो. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये भारतीय समाजजीवनाची जाणीव, सामाजिक उत्तरदायित्व आणि संविधानिक मूल्यांची रुजवणूक करण्यासाठी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा अभ्यास अत्यंत उपयुक्त ठरतो. त्यांच्या लेखनातून समावेशक समाज, सामाजिक न्याय आणि मानवी समानतेचे मूल्य प्रभावीपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचते. म्हणूनच विविध विद्यापीठे आणि शैक्षणिक संस्थांम ध्ये त्यांच्या साहित्याचा अभ्यास आजही महत्त्वाने केला जातो.

अण्णाभाऊ साठे यांचा स्मृतिदिन हा केवळ अभिवादनाचा दिवस नसून आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. त्यांच्या विचारांचा वारसा जपण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने समतेच्या मूल्यांचा स्वीकार करणे, जातीय आणि सामाजिक भेदभाव दूर करण्यासाठी प्रयत्न करणे, श्रमाला सन्मान देणे आणि वंचित घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी संवेदनशील राहणे आवश्यक आहे. त्यांच्या साहित्याचे वाचन, संशोधन आणि प्रसार हीदेखील त्यांना खरी आदरांजली ठरेल. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या संघर्षमय जीवनातून सिद्ध केले की, प्रतिभा ही कोणत्याही जाती, वर्ग किंवा आर्थिक परिस्थितीची मक्तेदारी नसते. प्रतिकूल परिस्थितीतही जिद्द, परिश्रम आणि सामाजिक बांधिलकी यांच्या बळावर माणूस इतिहास घडवू शकतो. त्यांनी स्वतः अनुभवलेल्या वेदनांना शब्द दिले, उपेक्षितांच्या संघर्षाला दिशा दिली आणि साहित्याला सम ाजपरिवर्तनाचे प्रभावी शस्त्र बनविले. म्हणूनच ते केवळ एका समाजाचे नव्हे, तर संपूर्ण मानवतेचे लोकशाहीर ठरतात.

आज अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनी त्यांच्या कार्याचे स्मरण करताना त्यांच्या समतावादी विचारांना आपल्या आचरणात उतरविण्याची गरज अधिक प्रकर्षाने जाणवते. संविधानाने दिलेली सम ता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय ही मूल्ये प्रत्यक्ष जीवनात रुजविणे, श्रमिकांचा सन्मान करणे, वंचितांच्या हक्कांसाठी उभे राहणे आणि मानवी प्रतिष्ठेला सर्वोच्च स्थान देणे, हीच त्यांच्या स्मृतीला खरी आदरांजली ठरेल. त्यांच्या साहित्याचा प्रकाश येणाऱ्या पिढ्यांना प्रेरणा देत राहील, सामाजिक परिवर्तनाचा मार्ग उजळत राहील आणि समताधिष्ठित भारताच्या निर्मितीसाठी सतत ऊर्जा देत राहील. अशा या महान लोकशाहीराला त्यांच्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन.

**– डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्र आणि मराठीचे अभ्यासक आहेत)

# संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अग्रेसर – अण्णाभाऊ

अण्णा भाऊ साठे पहिल्यांदा कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या कम्युनिस्ट विचारसरणीने प्रभावित झाले. १९४४ म ध्ये दत्ता गव्हाणकर आणि अमर शेख या शाहिरांच्या सोबत त्यांनी ङ्गलालबावटाङ्क कला पथक स्थापन केले. लावण्या, पोवाडे व पथनाटये या माध्यामातून त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलन, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ व गोवा मुक्ती आंदोलनात जनजागृती करण्यासाठी मुंबई, मराठवाडा, विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र तसेच सिम ाभागातील अनेक ठिकाणी शाहीरांनी आपल्या ‘लालबावटा’ कलापथकातर्फे संपूर्ण महाराष्ट्र ढवळून काढला. याद्वारे त्यांनी अनेक सरकारी निर्णयांना आव्हान दिले होते. ते १९४० च्या दशकामध्ये कार्यरत राहिले आणि तेविया अब्राम्स यांच्यानुसार भारतातील साम्यवादाच्या आधी स्वातंत्र्याच्या नंतरची ‘१९५० च्या दशकातील सर्वात रोमांचक नाटकीय घटना’ होती. भारतीय स्वातंत्र्यानंतर उच्चवर्णीयांचे भारतावरील शासन त्यांना मान्य नव्हते म्हणून त्यांनी १६ ऑगस्ट १९४७ रोजी मुंबई येथे वीस हजार लोकांचा मोर्चा काढला आणि त्या म ोर्च्यातील घोषणा होती, ङ्गये आझादी झूठी है, देश कि जनता भूखी है!ङ्क इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशन म ध्येही ते एक महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्व होते, जी भारतीय कम्युनिस्ट पक्षाची एक सांस्कृतिक शाखा होती आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये ज्याने भाषिक विभागातून वेगळे मराठी भाषी राज्य (बॉम्बे राज्य) निर्माण करण्याची मागणी केली होती. या चळवळीत त्यांची अग्रसर भूमीका होती.

अण्णाभाऊ साठे म्हणून ओळखले जाणारे एक मराठी समाजसुधारक, लोककवी आणि लेखक होते. त्यांचे लेखन सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या कृतिशीलतेवर आधारलेले होते. साठे हे मार्क्सवादी-आंबेडकरवादी प्रवृत्तीचे होते, सुरुवातीला त्यांच्यावर साम्यवादी विचारसरणीचा प्रभाव होता. दलित साहित्याचे संस्थापक म्हणून त्यांना श्रेय दिले जाते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत देखील त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे परिवर्तनाला दिशा व चालना देणारे ठरले आहे. महाराष्ट्राच्या एकूणच जडणघडणीत आणि परिवर्तनात या साहित्याचे योगदान हे महत्त्वपूर्ण मानले जाते. आजही मोठ्या संख्येने विद्यार्थी व अभ्यासक हे त्यांच्या या साहित्याचा संशोधनात्मक अभ्यास करतांना दिसतात. संयुक्त महाराष्ट्र चळवळ लोकमानसात रुजविण्याचे काम शाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर अमर शेख आणि शाहीर गव्हाणकर यांनी केले. म ुंबई, मराठवाडा, विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र तसेच सीमा भागातील अनेक ठिकाणी शाहिरांनी आपल्या लालबावटा कलापथकाचे कार्यक्रम सादर केले.

प्र. के. अत्रे, कॉ. श्री. अ. डांगे, एसेम, शाहीर अमर शेख, शाहीर गव्हाणकर यांच्या संपर्कात आल्याने अण्णाभाऊंचे लेखन अधिक खुलत गेले. महात्मा ज्योतीबा फुले, राजर्षी शाहू महाराज, क्रांतीवीर लहुजी साळवे यांच्या प्रेरणेने त्यांना साहित्यात अधिष्ठान लाभले. अण्णाभाऊंनी मराठी साहित्यात मानाचे स्थान मिळिवले असले तरी, त्यांचा मूळिपंड शाहिराचा आणि कविचा होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे, ङ्गमार्क्सवाद भाकरीचा प्रश्न सोडवील, पण माणुस म्हणुन जगण्याचा प्रश्न शिल्क राहतोच. मला भाकरी पेक्षा इज्जत आणि स्वाभिमान प्यारा आहेङ्क या विचाराने अण्णाभाऊ भारावून गेले. हा स्वाभिमान त्यांनी निर्माण केलेल्या पात्रातून आपले अस्तित्व दाखवू लागला. त्यांनी आपल्या उभ्या आयुष्यात दोन गोष्टींचा तिटकारा केला. एक म्हणजे श्रीमंतांकडुन होणारे गरीबांचे शोषण नि-अस्पृश्य बांधवांची होणारी धार्मिक, सामाजिक पिळवणुक या बाबींवर आपल्या लेखणीने सतत प्रहार केले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत आणि गेल्या ५० वर्षात झालेल्या साहित्य, संस्कृतीच्या जडण-घडणीत मराठी साहित्य आणि साहित्यीकांचे योगदान त्यात प्रामुख्याने अण्णाभाऊंचे लक्षणीय ठरले.

भाऊ साठेंच्या पोवाडा आणि लावणी यांसारख्या लोककथात्मक कथा शैलींच्या वापराने लोकांमध्ये ते लोकप्रिय बनले व त्यांचे कार्य अनेक समुदायांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीला अर्पण केलेल्या ‘फकिरा’ मध्ये, साठेंनी आपल्या समुदायाला पूर्ण भुखमरीपासून वाचवण्यासाठी



ग्रामीण रूढिवादी प्रणाली आणि ब्रिटिश शासनाच्या विरुद्ध विद्रोह करणाऱ्या नायक फकिराला चित्रित केले. नायक आणि त्याच्या समुदायाला नंतर ब्रिटिश अधिकारी द्वारे अटक आणि छळ दिला जातो आणि अखेरीस फकिराला फाशी देऊन ठार मारले जाते. भाऊ साठे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणुकींना अनुसरत दलित कार्याकडे वळले आणि दलित व कामगारांच्या जीवनातील अनुभवांना प्रकट करण्यासाठी त्यांच्या कथांचा वापर केला. १९५८ मध्ये बॉम्बेमध्ये स्थापन केलेल्या पहिल्या दलित साहित्य संमेलनात आपल्या उद्घाटन भाषणात त्यांनी म्हटले की, पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरलेली नसून दलित व कामगार लोकांच्या तळहातावर तरलेली आहेङ्क यातून त्यांनी जागतिक संरचनांम ध्ये दलित आणि कामगार वर्गांचे महत्त्व स्पष्ट केले.

या काळातील बहुतांश दलित लेखकांच्या विपरित, साठेंचे कार्य मार्क्सवादाच्या प्रभावाखाली होते. त्यांनी म्हटले आहे की, ङ्गदलित लेखकांना सध्याच्या सांसारिक व हिंदू अत्याचारांपासून दलितांना मुक्त करणे आणि त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. कारण दीर्घकालीन पारंपरिक श्रद्धांना त्वरित नष्ट केले जाऊ शकत नाही.ङ्क

अण्णाभाऊंच्या गोष्टींत अथवा लिखाणात विनोद नसतो, असं नाही; पण त्यांचा प्रकृतीधर्म आहे गंभीर लेखकाचा. ज्यांनी फार भोगलं आहे, सात पडद्यांतून नव्हे, तर समोरासमोर जीवनातल्या क्रूर सत्याचं ज्याला दर्शन घडलं आहे. अशा पोटतिडकीने लिहणाऱ्या साहित्यिकाचा आत्मा त्यांना लाभला आहे. म्हणून साहजिकच त्यांच्या गोष्टी मोठ्या वैशिट्यपूर्ण असतात. म्हणून तत्कालीन सर्व बड्या कथाकारांपेक्षा ते निराळे आहेत. या लेखकाला प्रतिभेचे देणं लाभलं आहे. जीवनात आग ओकणाऱ्या सर्व तऱ्हेच्या गोष्टींच्या अनुभव त्यांच्या गाठी आहे. त्यांच्या मनात एकप्रकारचा पीळ आहे. ते अन्यायाविरुद्ध बंड उभारणाऱ्या वृत्तीचे पूजक आहेत.ङ्क

मुंबई, पुणे आणि मधील शहरी पर्यावरणाने त्यांच्या लिखाणावर लक्षणीय प्रभाव टाकला. त्यांनी तो डायस्टोपियन परिवाराच्या रूपात दाखवला.

त्यांनी त्यांच्या मुंबईची लावणी आणि मुंबईचा गिरणी कामगार या दोन गाण्यांतून मुंबईला दुर्व्यवहारी, शोषणकारी, असमान और अन्यायपूर्ण असे म्हटले आहे. त्यांच्या कार्याचा मोजदाद करताच येत नाही, इतक्या भव्य प्रमाणात त्यांची कारकीर्द नजरेत भरते, तिला दुर्लक्षित करुन चालणार नाही. भाऊ साठे हे दलितांचे आणि विशेषतः मांग जातीचे प्रतीक बनले आहेत.

शासन मान्यता असलेली लोकशाहीर अण्णाभाऊ साठे डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनची स्थापना १९८५ मध्ये मांग समाजातील लोकांसाठी करण्यात आली. तसेच मानव हक्क अभियानाच्या (एक मांग-आंबेडकरी संस्था) मार्फत विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. अत्यंत महत्वाचे म्हणजे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष- शिवसेना युती सारख्या राजकीय पक्षांनी मांगांकडून निवडणुकांम ध्ये समर्थन मिळिवण्यासाठी त्यांच्या प्रतिमेचा वापर केला आहे आणि आजही करीत असतात. संयुक्त महाराष्ट्र चळवळ लोकमानसात रुजविण्याचे काम शाहीर अण्णाभाऊ साठे यांनी केले. साठे यांनी मराठी भाषेत ३५ कादंबऱ्या लिहिल्या. त्यामध्ये फकिरा (१९५९) समाविष्ट आहे, ज्याला १९६१ मध्ये राज्य सरकारच्या उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार मिळाला आहे. साठेंच्या लघु कथांचा संग्रह १५ आहे, ज्यामध्ये मोठ्या संख्येने बऱ्याच भारतीय भाषांम ध्ये आणि २७ गैरभारतीय भाषांमध्ये भाषांतरित केल्या गेल्या आहेत. कादंबरी आणि लघुकथा यांच्या व्यतिरिक्त साठे यांनी नाटक, रशियातील भ्रमंती, १२ पटकथा आणि मराठी पोवाडा शैलीतील १० गाणी लिहिली.

१ ऑगस्ट २००१ रोजी भारतीय पोस्टाने ४ रु. च्या टपाल तिकिटावर साठेंचे चित्र ठेवले होते. साठेंच्या जन्म शताब्दी वर्षाच्या निमित्ताने १ ऑगस्ट २०१९ रोजी हे टपाल तिकीट वितरित करण्यात आले. पुण्यातील सेनापती बापट चौकानजीक रस्त्याला अण्णाभाऊ साठे मार्ग म्हणुन घोषित करण्यात आले. मुंबईच्या कुर्लामधील एका उड्डाणपुलासह अनेक इमारतींना त्यांचे नांव देण्यात आले आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनी, त्यांना आदराने व विनम्रपणे श्रद्धांजली अर्पण करणे, हा मराठी भाषिकांसाठी एक महत्त्वाचा दिवस असतो. त्यांच्या कार्याला व विचारांना स्मरून त्यांना आदराने अभिवादन करणे, हा या दिवसाचा उद्देश आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या ५६ व्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**– प्रविण बागडे,** नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# जनसामान्यांचे कैवारी; लोकशाहीर अण्णा भाऊ साठे

'जग बदल घालुनी घाव-सांगून गेले मज भिमराव' अशी वाघ ललकारी देणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे महाराष्ट्राचे अनमोल रत्न होत. आपल्या पहाडी आवाजाने महाराष्ट्र चळवळ उभी करणारे अफलातून व्यक्तिमत्व आणि हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा कुळवाडी भूषण पोवाडा थेट रशिया देशात जाऊन गाणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे म्हणजे महाराष्ट्र राज्याला मिळालेली अनमोल देणगी होय.

साहित्य रचना-फकिरा, वारणेचा वाघ, माकडीचा माळ, चिखलातील कमळ, वैर तसेच गजाआड माझा रशिया प्रवास अशा असंख्य साहित्य निर्मितीने अण्णाभाऊ साठे आजही चिर स्मरणात आहेत. अण्णाभाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट, १९२० रोजी वाटेगाव ता,वाळवा जि.सांगली येथे झाला. त्यांचे जन्म नाव तुकाराम भाऊराव साठे असे आहे तर टोपण नाव अण्णाभाऊ साठे असे आहे. ते फक्त दीड दिवसच शाळेत गेले होते. त्यांची ओळख म्हणजे त्यांचे लेखन कार्य होय.वर्ष १९३२ साली ते वडिलांबरोबर मुंबई ला आले.

चरितार्थ साठी कोळसा वेचणे, फेरीवाल्यांच्या पाठीशी गाठोडे घेऊन हिंडणे, गिरणीत झाडूवाला म्हणून काम करणे, ही कामे अण्णा भाऊ करू लागले. हे काम करीत असताना दुकानांच्या पाट्या वाचून ते शिकले. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांचा सहभाग होता. त्यामुळे ब्रिटिश सरकारने त्यांच्या बिरोधात वारंट काढले होते. दलित आणि श्रमिक यांच्या समृद्धीचे स्वप्न ते पाहत होते. ही पृथ्वी शेष नागाच्या मस्तकावर तरलेली नसून श्रमिक, दीन, दलित यांच्या हातावर तरलेली आहे असे ते ठणकावून सांगत असत.त्यांनी १९४४ साली लाल बावटा पथक ही स्थापन केले होते.

या पथकावर इंग्रज सरकारने बंदी टाकली होती. अण्णाभाऊ साठे ज्या समाजात जन्मले त्या समाजाला परिपूर्णपणे उभे करण्याचे काम त्यांनी केले.

– धोंडीरामसिंह राजपूत

### लोकशाहीर अण्णाभाऊ साठे

अण्णाभाऊ साठेंचे असे जगी कार्य महान
लेखन, शाहीरीचेआज ही जगी असे गुण-गान
'जग बदल घालुनी घाव सांगून गेले मज भीमराव'
या गीताच्या स्फूर्तीने अण्णा भारावले राव
सामाजिक न्यायाची अण्णांची विशाल दृष्टी
या दृष्टीने फुलविली दीन, दुबळ्याची सृष्टी
अण्णाभाऊ साठे कार्य त्यांचे मोठे
समाजासाठी रचले सामाजिक ज्ञान ओटे
महाराष्ट्र जडणघडणीत सिंहाचा त्यांचा वाटा
इंग्रज सरकारवरअसे त्यांचा शब्दाचा पाटा
लोकशाहिरांनी केली समाजाची जागृती
देशाची टिकविली त्यांनी महान संस्कृती
स्मृतींना लोकशाहिरांच्या अभिवादन करू या
लोकशाहिरांचे कार्य पुढे आपण चालऊ या.....

– धोंडीरामसिंह राजपूत

# ग्रामीण भागातील सर्व शाळांमध्ये नशामुक्ती अभियान व बालविवाह प्रतिबंध जनजागृती मोहीम उत्साहात

छत्रपती संभाजीनगर, दि. १७ (प्रतिनिधी) – जिल्ह्यात दि. १३ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या नशामुक्ती अभियान व बालविवाह प्रतिबंध अभियान अंतर्गत आज ग्रामीण भागातील सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये मा. मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांनी दिलेल्या सूचनांनुसार व्यापक जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या अभियानांतर्गत आरोग्य विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शाळांना भेट देऊन विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थांशी संवाद साधला. यावेळी तंबाखू, गुटखा, पानमसाला, सिगारेट, बीडी, मद्य आदी विविध प्रकारच्या व्यसनांचे शरीर व मनावर होणारे घातक दुष्परिणाम सविस्तरपणे समजावून सांगण्यात आले.

विद्यार्थ्यांना व्यसनामुळे शारीरिक आरोग्य बिघडणे, मानसिक तणाव व नैराश्य वाढणे, वाईट संगती लागणे, आत्मविश्वास कमी होणे, स्मरणशक्तीवर परिणाम होणे तसेच शिक्षण व भविष्यातील प्रगतीवर विपरीत परिणाम होणे याविषयी माहिती देण्यात आली.

तसेच शैक्षणिक संस्थांच्या १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करण्यास बंदी असल्याची माहिती देण्यात आली. व्यसनाची सुरुवात झाल्याचे आढळल्यास जवळच्या आरोग्य संस्थेशी संपर्क साधून शासनमान्य व्यसनमुक्ती केंद्रामध्ये उपचार व समुपदेशन घेण्याचे आवाहन करण्यात आले. नियमित आरोग्य तपासणी, योग, ध्यान व आरोग्यदायी जीवनशैली स्वीकारण्याचा संदेशही यावेळी देण्यात आला. यानंतर उपस्थित सर्व विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ तसेच आरोग्य विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नशामुक्तीची सामूहिक शपथ घेतली.

त्यानंतर बालविवाह प्रतिबंध विषयावर मार्गदर्शन करताना मुलीचे वय १८ वर्षांपेक्षा कमी व मुलाचे वय २१ वर्षांपेक्षा कमी असताना केलेला विवाह हा बालविवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ अंतर्गत कायद्याने गुन्हा असल्याची माहिती देण्यात आली.

बालविवाहामुळे मुलींचे शिक्षण अर्धवट राहणे, अल्पवयीन गर्भधारणेमुळे माता व बालकाच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होणे, माता व बालमृत्यूचा धोका वाढणे, कुपोषण, मानसिक तणाव, आर्थिक स्वावलंबन कमी होणे तसेच सामाजिक समस्या निर्माण होण्याची शक्यता याविषयी विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यानंतर शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, सर्व विद्यार्थी, उपस्थित ग्रामस्थ तसेच आरोग्य विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बालविवाह प्रतिबंधाची सामूहिक शपथ घेतली. यावेळी प्रत्येक मुलगा-मुलीचे शिक्षण पूर्ण होण्यासाठी प्रोत्साहन देणे, विवाहापूर्वी वयाची खात्री करणे, संशयास्पद बालविवाहाची माहिती तात्काळ संबंधित प्रशासनाला देणे तसेच ग्रामपंचायत, शाळा, महिला व बालविकास विभाग, पोलीस व आरोग्य विभाग यांनी समन्वयाने कार्य करून नशामुक्त व बालविवाहमुक्त छत्रपती संभाजीनगर घडविण्याचे आवाहन आरोग्य विभाग छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत करण्यात आले.




- माझे शरीर, माझे आरोग्य, माझे भविष्य नशामुक्त राहणे हीच माझी ताकद.
- बालविवाहाला नकार – शिक्षण, आरोग्य आणि उज्वल भविष्याला होकार.

# शहरातील अनधिकृत होर्डिंग्जविरोधात मनपाचा दणका

## १८ जुलैपर्यंत स्वतःहून हटवा, अन्यथा कडक कारवाई

छत्रपती संभाजीनगर, दि. १७ (प्रतिनिधी) – शहराचे सौंदर्य, शिस्त आणि सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने अनधिकृत होर्डिंग्ज, फ्लेक्स व बॅनर्स विरोधात कठोर भूमिका घेतली आहे. शहरात विनापरवानगी उभारण्यात आलेल्या सर्व अनधिकृत होर्डिंग्ज तात्काळ हटविण्याचे निर्देश महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनी दिले असून, संबंधितांनी शनिवार, दि. १८ जुलै पर्यंत स्वतःहून ही सर्व होर्डिंग्ज व बॅनर्स काढून घ्यावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

**आयुक्त अमोल येडगे यांचे स्पष्ट निर्देश**

महानगरपालिकेकडून शहरभर अनधिकृत जाहिरातीं विरोधात सातत्याने कारवाई सुरू असून, तरीही अनेक ठिकाणी नियमांचे उल्लंघन करून होर्डिंग्ज व बॅनर्स उभारण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी संबंधित व्यक्ती, संस्था, संघटना व जाहिरातदारांना अंतिम इशारा देत मुदतीत अनधिकृत फलक हटविण्याचे आदेश दिले आहेत.

निर्धारित मुदती नंतरही अनधिकृत होर्डिंग्ज अथवा बॅनर्स आढळून आल्यास महानगरपालिकेच्या पथकांकडून ते तात्काळ हटविण्यात येतील. तसेच संबंधितांवर लागू कायदे व नियमांनुसार दंडात्मक तसेच कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले आहे.

शहराचे विद्रुपीकरण रोखणे, रस्ते व सार्वजनिक ठिकाणे अतिक्रमणमुक्त ठेवणे, तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणे, हा या विशेष मोहिमेचा उद्देश असल्याचे मनपा प्रशासनाने सांगितले आहे.

महानगरपालिकेने सर्व नागरिक, सामाजिक संस्था, राजकीय पक्ष, व्यापारी व जाहिरातदारांना नियमांचे पालन करून शहर सुशोभीकरणाच्या मोहिमेस सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

# मणिपूरमध्ये सिद्धिविनायक मंदिराची प्रतिकृती उभारणार

## – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

मुंबई, दि. १७ (प्रतिनिधी) – महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या मुंबईच्या श्री सिद्धिविनायक मंदिराची भव्य प्रतिकृती लवकरच मणिपूरमध्ये उभारली जाणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी केली. दिल्लीतील महाराष्ट्र सदनात आयोजित 'ईशान सेतू – सांस्कृतिक एकात्मता व राष्ट्रनिर्माण' सोहळ्यात ते बोलत होते. श्री सिद्धिविनायकाच्या कृपेने हे मंदिर महाराष्ट्र आणि ईशान्य भारत यांच्यातील धार्मिक, सांस्कृतिक आणि भावनिक नात्याचा एक मजबूत 'ईशान सेतू' ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात शिंदे यांनी भारताच्या सांस्कृतिक ऐक्याचा आणि ईशान्य भारताशी आत्मीय नाते दृढ करण्याचा संदेश दिला.

या सोहळ्याला स्वामी गोविंददेव गिरी, स्वतंत्र देव सिंह, विविध राज्यांतील लोकप्रतिनिधी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, सामाजिक-सांस्कृतिक संस्थांचे प्रतिनिधी आणि देशातील प्रमुख मंदिर ट्रस्टचे पदाधिकारी उपस्थित होते. स्वामी गोविंददेव गिरी आणि अमित शाह यांच्या हस्ते रामायण, श्रीमद्भगवद्गीता, हनुमान चालीसा यांसारख्या महान ग्रंथांचे ईशान्य भारतातील स्थानिक भाषांमधील अनुवाद या वेळी प्रकाशित करण्यात आले. ईशान्य भारतातील नागरिकांपर्यंत या पवित्र ग्रंथांचे मोफत वितरण करण्याचा संपूर्ण खर्च उचलण्याची मोठी जबाबदारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वैयक्तिकरित्या स्वीकारली असून, भारतीय संस्कृतीचा वारसा घराघरांत पोहोचविण्याच्या या अभियानात त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला आहे. ईशान्य भारतातील समृद्ध साहित्याचे हिंदी आणि मराठी भाषेतही भाषांतर व्हावे, अशी विनंती त्यांनी 'ईशान सेतू ट्रस्ट'ला केली असून या साहित्यिक देवाणघेवाणीला महाराष्ट्र सरकारतर्फे पूर्ण सहकार्य देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

### अमित शाह यांच्या नेतृत्वाचा गौरव

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या कार्याचा गौरव करताना एकनाथ शिंदे म्हणाले की, त्यांच्या सक्षम नेतृत्वामुळे देशाची अंतर्गत सुरक्षा अधिक मजबूत झाली असून नक्षलवादावर प्रभावी नियंत्रण मिळवण्यात यश आले आहे. ईशान्य भारतातील अनेक दशकांचा संघर्ष आणि तणाव कमी झाला असून विविध सशस्त्र संघटनांशी शांतता करार झाले आहेत. सुमारे १० हजार ८०० हून अधिक युवकांनी हिंसेचा मार्ग सोडून विकासाच्या मुख्य प्रवाहात येण्याचा निर्णय घेतला असून, नागरिकांच्या मृत्यूंमध्ये ८६ टक्क्यांनी घट झाली आहे. ईशान्य भारताला देशाच्या इतर भागांशी आर्थिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या जोडण्याचे अमित शाह यांचे मिशन देशासाठी मोलाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

# नशामुक्त व बालविवाह प्रतिबंध जनजागृती



अशोकदादा गरुड शैक्षणिक समूहाचे ज्ञानविकास विद्यालय भराडी येथे नशामुक्त व बालविवाह प्रतिबंध जनजागृती करण्यात आली. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ प्रतीक सुराणा, एकात्मिक बालविकास विभागाच्या पर्यवेक्षिका सिल्लोड प्रकल्प १ श्रीमती वाघमारे व अंगणवाडी सेविका, सह ज्ञानविकास विद्यालय चे विद्यार्थी व शिक्षक वृंद मिळून दोन्ही सामाजिक समस्या घडू नये याबाबत चर्चा व मार्गदर्शन करून प्रतिज्ञापूर्वक शपथ घेण्यात आली.

# रोटेगाव(दमरे)स्टेशनवर पुणे, मुंबई, अमृतसर जाणाऱ्या रेल्वे गाड्याना थांबा द्या

## आमदार बोरनारे यांची रेल्वे मंत्र्याकडे मागणी

वैजापूर, दि. १७ (प्रतिनिधी) – रोटेगाव रेल्वे स्टेशन हे संभाजीनगर जिल्ह्यातील एकमेव अमृत भारत रेल्वे स्टेशन आहे. रोटेगाव हे मनमाड -संभाजीनगर रेल्वे मार्गावर रेल्वेला सर्वात जास्त आर्थिक लाभ मिळवून देणारे एकमेव स्टेशन आहे.रेल्वे खात्याला पांच कोटी रुपये उत्पन्न देणारे हे



स्टेशन आहे अशी माहिती मिळाली आहे म्हणून या स्टेशनला अमृत भारत दर्जा देण्यात येऊन हे स्टेशन विकसित करण्यासाठी अत्याधुनिक सोयी सुविधाचे बांधकाम येथे चालू आहे. वैजापूर साठी हे स्टेशन केवळ ३ की.मी. अंतरावर आहे. येथून दररोज

हजार च्या जवळपास प्रवाशी ये-जा करतात.वैजापूर हे विकसित होणारे शहरआहे. प्रवाशाना लांब पल्याच्या गावी जाण्यासाठी-येण्यासाठी मनमाड किंवा संभाजीनगला जावे लागते. व्यापारी यांना, विद्यार्थ्यांना सुविधा व्हावी यास्तव येथील वैजिनाथ जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष प्रकाश शेठ बोथरा, सचिव धोंडीरामसिंह राजपूत, कोषाध्यक्ष सुरेश संत, बबन क्षीरसागर यांनी आ.रमेश पा. बोरनारे यांना ही अडचण सांगताच आ.बोरनारे यांनी गुरुवार(ता,१६) रोजी रेल्वे मंत्री ना.अश्विनी वैष्णवी जी याना पत्र देऊन नरसापूर-नगरसोल, नांदेड-पुणे, तसेच सचखंड एक्सप्रेस, जनशताब्दी एक्सप्रेस, वंदे भारत एक्सप्रेस व तालुक्यातील परसोडा व करंजगाव रेल्वे स्थानक येथे मनमाड -धर्माबाद रेल्वे थांबविण्याची विनंती केली. रेल्वे मंत्री. ना. वैष्णवी जी, तसेच दमरे चे सिकंदराबाद येथील जी.एम. याना ही विनंती पत्र देण्यात आली आहेत. रोटेगाव येथील स्टेशन अधीक्षक अरविंद कुमार यादव यांना ही प्रत देऊन डी. आर. एम. नांदेड यांनाही आ.प्रा,रमेश पा.बोरनारे यांचे विनंती पत्र जेष्ठ नागरिक संघचे अध्यक्ष प्रकाश शेठ बोथरा, सचिव धोंडीरामसिंह राजपुत, कोषाध्यक्ष सुरेश संत यांनी देऊन पाठपुरावा करण्याची विनंती केली आहे. या प्रसंगी जेष्ठ स्टेशन अधीक्षक रमेश मीना ही उपस्थित होते.

# 'सम्यम'तर्फे सर्वधर्मीय गुणवंतांचा शनिवारी सत्कार

छत्रपती संभाजीनगर, दि. १७ (प्रतिनिधी) – सम्यक बौद्ध उपासक, उपासिका संघातर्फे शहरातील सर्व जातीधर्मातील गुणवंत विद्यार्थ्यांचा शनिवारी (दि.१८) सायंकाळी ५ वाजता मौलाना आझाद संशोधन केंद्राच्या सभागृहात सत्कार करण्यात येणार आहे.

सर्व जातीय व धर्मिय गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्याची सम्यकने सुरू केलेल्या परंपरचे हे १२ वर्ष आहे. विशेष गुणवत्तेसह उत्तीर्ण (७५ टक्क्यांपासून पुढे) दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर सर्व शाखांच्या अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसह , युपीएसी, एम पीएससी उत्तीर्ण उमेदवारांचा यानिमित्त सत्कार करण्यात येणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील उर्दू विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ.कीर्ती मालिनी इंगळे यांची प्रमुख उपस्थिती राहिल.

डॉ. शासकीय कर्करोग रुग्णालयाचे विशेष कार्यअधिकारी डॉ.अरविंद गायकवाड अध्यक्षस्थानी असतील. गुणवंतांनी आपले गुणपत्रक सम्यकचे समन्वयक भीमराव मुगदल, इंजिनीअर सुनील खंदारे, कृष्णा भंडारे, संजय डोंगरे, भारत शिंदे यांच्याकडे जमा कराव्यात, असे आवाहन संयोजक इंजी. भास्कर म्हस्के, डॉ. यशवंत कांबळे, राजू जुमडे, फुलचंद गायकवाड आदींनी केले आहे.

# शिवशैली नृत्यगाथेला संभाजीनगरकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## नृत्य, अभिनय आणि संगीताच्या माध्यमातून उलगडला छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रेरणादायी इतिहास

छत्रपती संभाजीनगर, दि. १७ (प्रतिनिधी) – संत एकनाथ रंगमंदिर येथे आयोजित 'शिवशैली – शिवशाही संस्कृतीची तेजोमय नृत्यगाथा' या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाला संभाजीनगरकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मापासून राज्याभिषेकापर्यंतचा प्रेरणादायी इतिहास नृत्य, अभिनय, संगीत आणि आधुनिक प्रकाशयोजनेच्या माध्यमातून प्रभावीपणे सादर करण्यात आला.



२५ हून अधिक कलाकारांनी विविध ऐतिहासिक प्रसंगांचे दमदार सादरीकरण केले. स्वराज्य स्थापनेचा संघर्ष, अफजलखान वध, राज्याभिषेक आदी प्रसंगांनी उपस्थितांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. प्रत्येक सादरीकरणाला प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट करत भरभरून दाद दिली. त्यामुळे संपूर्ण सभागृह शिवमय वातावरणाने भारावून गेले होते.

या कार्यक्रमाचे आयोजन व्हॉट द मीडिया यांच्या पुढाकाराने द डेझर्ट स्टोरी यांच्या सहकार्याने करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परमधारा इव्हेंट्स, ब्रँड बडीज मीडिया, ट्रेक बाय फ्रेंड्स ट्रेक नेशन, पृथ्वी इंजिनिअरिंग सर्व्हिसेस, कालिका कन्स्ट्रक्शन आणि स्नॅपर फोटोग्राफी यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे आयोजक ऋतुराज घरमोडे यांनी उपस्थित प्रेक्षक, कलाकार, मान्यवर, प्रायोजक, सहकार्य करणाऱ्या संस्था, स्वयंसेवक आणि माध्यम प्रतिनिधी यांचे आभार मानले. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, स्वराज्याची प्रेरणा आणि शिवशाहीचा सांस्कृतिक वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी भविष्यातही अशा सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्या महाराष्ट्रासाठी धोक्याची घंटा : भारत दिघोळे

## शेतकरी वाचविण्यासाठी शासन, तज्ज्ञ, संघटना आणि समाजाने एकत्र येण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. १७ (प्रतिनिधी) – मराठवाड्यात यंदाच्या पहिल्या सहा महिन्यांत झालेल्या शेतकरी आत्महत्यांच्या घटना संपूर्ण महाराष्ट्रासाठी धोक्याची घंटा असून, हा केवळ एका प्रदेशाचा नव्हे तर संपूर्ण कृषी व्यवस्थेचा गंभीर प्रश्न आहे. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शासन, प्रशासन, कृषी तज्ज्ञ, शेतकरी संघटना आणि समाजाने एकत्रितपणे काम करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भारत दिघोळे यांनी केले.



प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात दिघोळे यांनी सांगितले की, वाढता उत्पादन खर्च, शेतीमालाला न मिळणारा किफायतशीर दर, हवामानातील अनिश्चितता, कर्जबाजारीपणा आणि बाजारपेठेतील अस्थिरता यामुळे शेतकरी आर्थिक व मानसिक संकटात सापडत आहेत. त्यामुळे मराठवाड्यातील आत्महत्या ही संपूर्ण राज्यासाठी गंभीर इशारा मानून दीर्घकालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

कांदा, कापूस, सोयाबीन, तूर, द्राक्ष, डाळिंब यांसह विविध पिकांच्या शेतकऱ्यांसमोर जवळपास समान समस्या आहेत. त्यामुळे हा प्रश्न केवळ एका पिकापुरता मर्यादित नसून संपूर्ण कृषी क्षेत्राशी संबंधित असल्याचे त्यांनी नमूद केले. महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटना गेल्या दशकभरापासून कांदा उत्पादकांच्या प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा करत असून, आता शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी व्यापक भूमिका घेणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राज्यातील शेतकरी, कृषी अभ्यासक, अर्थतज्ज्ञ, मानसोपचार तज्ज्ञ, सामाजिक संस्था आणि विविध शेतकरी संघटनांशी संवाद साधून उपाययोजनांबाबत शिफारशी तयार करून त्या शासनाकडे सादर करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. दिघोळे यांनी राज्य व केंद्र शासनाला उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव, स्थिर निर्यात-आयात धोरण, बाजारपेठेतील पारदर्शकता, नैसर्गिक आपत्तींविरोधातील प्रभावी संरक्षण, सुलभ कर्जव्यवस्था आणि शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढविणाऱ्या दीर्घकालीन कृषी धोरणाला प्राधान्य देण्याचे आवाहन केले. तसेच शेतकरी आत्म हत्यांच्या प्रश्नावर राजकारण न करता सर्वांनी सकारात्मक भूमिका घेऊन शेतकरी वाचविण्यासाठी एकत्र येण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# सरसेनापती नेताजी पालकर यांच्या भव्य स्मारकाला शासनाचा सकारात्मक निर्णय-पालकमंत्री अतुल सावे

नांदेड दि.१७ (प्रतिनिधी)- छत्रपती शिवाजी महाराजांचे पराक्रमी सरसेनापती नेताजी पालकर यांच्या नांदेड जिल्ह्यातील हदगांव तालुक्यातील तामसा येथील उपेक्षित समाधी स्थळी भव्य व उच्च दर्जाचे स्मारक उभारण्यात यावे,या मागणीसाठी सुरू झालेल्या बेमुदत आंदोलनाला अखेर मोठे यश आले आहे. नांदेडचे पालकमंत्री नामदार अतुल सावे यांनी या स्मारकाच्या निर्मितीला अधिकृत मान्यता दिली आहे.

तामसा येथील ऐतिहासिक समाधी स्थळाचा विकास व्हावा आणि तिथे भव्य स्मारक उभारले जावे, या मागणीसाठी १६ जुलै २०२६ पासून नांदेड जिल्हाधिकारी कार्यालया समोर छावा मराठा संघटनेच्या वतीने बेमुदत उपोषण छावा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष किशोरभाऊ चव्हाण आणि मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक डॉ.राजेंद्र दाते पाटील यांच्या नेतृत्वाखाली पुकारल्या गेले होते. बबन पाटील,दीपक राजुरकर व कैलास शिंदे व अनेक आंदोलकांनी सक्रिय सहभाग घेतला होता.

या महत्वपूर्ण आंदोलनाची गंभीर दखल पालकमंत्री अतुल सावे यांनी घेतली आणि उपोषणकर्ते किशोर भाऊ चव्हाण व डॉ राजेंद्र दाते पाटील यांना चर्चेसाठी शिष्टमंडळासह निमंत्रित केले जिल्हाधिकारी नांदेड यांचे मुख्य सभागृहात पालकमंत्री अतुल सावे,खासदार डॉ अजित गोपछडे, जिल्हाधिकारी डॉ राहुल कर्डीले,आमदार भीमराव केराम, राजेश पवार आदी मान्यवरा समक्ष सरसेनापती नेताजी पालकर यांचे स्मारक या विषयावर कायदेशीर व महत्वाची मांडणी मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक उपोषणकर्ता डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी करतांना लक्षात आणुन दिले की,या स्मारका साठी सविस्तर प्रकल्प डी पी आर-अहवाल तयार करणे, या साठी पी एमसी-प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणे या साठी निवड करण्यासाठी जाहीर प्रगटन देणे व इतर कामाची सुरुवात करण्या साठी निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे.

छावा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष व उपोषण कर्ता किशोर चव्हाण यांनी नमुद केले की,तामसा हा परिसर नेताजी पालकरांच्या जहागिरीचा व उत्तरायुषाचा भाग असल्याने या स्थळाला मोठे ऐतिहासिक महत्त्वआहे. मात्र,सध्या हे ठिकाण मूलभूत सुविधां अभावी उपेक्षित असल्याने शिवप्रेमीं मधून तीव्र संताप व्यक्त होत होता.या ऐतिहासिक वारशाचे जतन करण्यासाठी शासनाने तात्काळ पावले उचलावीत,अशी भूमिका त्यांनी आग्रहपूर्ण मंडली.

शिष्ट मंडळाची मागणी व त्याची माहिती देतांना ते म्हणाले की पुढील यथा योग्य नियोजन करण्यासाठी पालकमंत्र्यांच्या अध्यक्षते खाली स्मारक सल्लागार समिती नियुक्त करण्यात यावी, जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन आढावा समिती स्थापन करून दरमहा बैठक घेण्यात यावी,स्मारकाचा सविस्तर प्रकल्प अहवाल आणि पूर्वतयारीसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार समिती तातडीने गठीत करावी आणि त्यात गतिमान पद्धतीने निर्णय व्हावा आदी बाबींची त्यांनी मांडणी केली.

पालकमंत्री अतुल सावे यांनी शिष्ट मंडळाचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले आणि या मागणीला शासकीय मान्यता देत एक कोटी रुपये कामाची सुरुवात करण्या साठी मंजूर केले.

या आंदोलनाला जन समुदायाचा पाठिंबा आणि लोकप्रतिनिधीनी यासह जिल्ह्यातील विविध क्षेत्रां तील शेकडो मान्यवर आणि सामाजिक संघटनांनी प्रत्यक्ष भेट देऊन आपला सक्रिय पाठिंबा दर्शविला.या आंदोलनाची तीव्रता आणि विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन आंदोलकांच्या मागणीस पाठिंबा दर्शवला हे उल्लेखनीय ठरले.खा.डॉ अजित गोपछडे,डॉ राहुल कर्डिले- जिल्हाधिकारी, आ. राजेश पवार,आ.भीमराव केराम यासह अनेक अधिकारी व पत्रकारांची उपस्थिती होती. पालकमंत्र्यांच्या या सकारात्मक निर्णयामुळे शिवप्रेमी आणि छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. यावेळी उपोषण कर्ता आंदोलक किशोर चव्हाण, उपोषण कर्ता आंदोलक डॉ.राजेंद्र दाते पाटील, छावा संघटनेचे प्रदेश अध्यक्ष इंजि. तानाजी हुस्सेकर, कामाजी पवार,सुनंदा जोगदंड, डॉ. प्रभाकर जाधव, दीपक पावडे, दीपक राजुरकर, कैलास शिंदे, बबन पाटील, संजय हंबर्डे, सुनील कदम दशरथ पाटील कपाटे, शिवानंद पाटील,विश्वजीत जाधव यासह अनेकांची उपस्थिती होती. पालक मंत्री अतुल सावे यांनी मंजुरी व तात्काळ निधी बाबत जिल्हाधिकारी डॉ.राहुल कर्डिले यांना योग्य त्या सर्व सुचना देऊन तात्काळ कार्यवाहीचे आदेश दिले आणि शिष्टमंडळ उपोषण कर्त्यास उपोषण संपविण्याची विनंती केली. या विनंतीस उपोषण कर्ते किशोर चव्हाण आणि डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी आणि सहकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. उपोषण स्थळी प्रशासनाचे पदाधिकारी यांनी जाऊन उपोषण कर्त्यास ज्यूस पाजला यात प्रशासनाचे संजय वारकड आणि त्यांचे सहकारी उपस्थित होते. उपोषण कर्त्यांच्या मागण्या मंजूर झाल्यामुळे उपोषण स्थगित करण्याची घोषणा उपोषण कर्ते किशोर चव्हाण आणि डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केली.

## समाधान कॉलनी उपकेंद्राची वीज आज काही काळ बंद

छत्रपती संभाजीनगर दि.१७ (प्रतिनिधी)- महावितरणच्या समाधान कॉलनी ३३ केव्ही उपकेंद्राच्या ५ एमव्हीए क्षमतेच्या रोहित्राची क्षमता १० एमव्हीए करण्याकरिता हे उपकेंद्र शनिवारी (१८ जुलै) काही काळ बंद राहील. या उपकेंद्राअंतर्गत येणारा समाधान कॉलनी, पदमपुरा, बन्सीलालनगर, रेल्वे स्टेशनअंतर्गत येणाऱ्या काही भागात शनिवारी सकाळी ७ ते दुपारी ४ वाजेपर्यंत वीजपुरवठा बंद राहील. ग्राहकांनी याची नोंद घेऊन सहकार्य करावे, असे आवाहन शहर-१ विभागाचे कार्यकारी अभियंता प्रसाद महातोले यांनी केले आहे.

## जिजाऊ चौक ते बळीराम पाटील रस्त्यावरील अतिक्रमणांवर मनपाचा हातोडा

छत्रपती संभाजीनगर दि.१७ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने जिजाऊ चौक ते बळीराम पाटील रस्त्यावरील अतिक्रमणांवर शुक्रवारी (१७ जुलै) मोठी कारवाई केली. या मोहिमेत २४ हातगाड्या जप्त करण्यात आल्या असून, ५१ अनधिकृत शेड्स निष्कासित करण्यात आले आहेत.



गेल्या काही दिवसांपासून या मार्गावर वाढलेले अतिक्रमण आणि अस्ताव्यस्त उभ्या राहणाऱ्या हातगाड्यांमुळे नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत होता. या समस्येची गंभीर दखल घेऊन महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली. अतिक्रमण विभागाचे सनियंत्रण अधिकारी संतोष वाहुळे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने जिजाऊ चौक ते बळीराम पाटील रोडवर अचानक धडक दिली. रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या अतिक्रमणांवर कारवाई सुरू होताच स्थानिक दुकानदारांनी व हातगाडीचालकांनी या मोहिमेला तीव्र विरोध दर्शवला. मात्र, मनपाच्या अधिकाऱ्यांनी व पथकाने हा विरोध जुगारून कारवाई सुरूच ठेवली आणि रस्ता अतिक्रमणमुक्त केला. या धडक मोहिमेमुळे वाहतुकीला मोठा अडथळा ठरणारे ५१ शेड्स भुईसपाट करण्यात आले, तर २४ हातगाड्या जप्त करून कारवाई करण्यात आली. या मोहिमेत सहाय्यक आयुक्त संजय सुरडकर, इमारत निरीक्षक रवींद्र देसाई, प्राप्ती जाधव, अशोक कदम यांच्यासह नागरी मित्र पथकाचे जवान आणि अतिक्रमण हटाव विभागाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कारवाईमुळे रस्ता मोकळा झाल्याने वाहनधारकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## जर जरी बक्ष उरूस यात्रोत्सव: भाविकांना सर्व सुविधा उपलब्ध करून द्या-जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.



छत्रपती संभाजीनगर दि.१७ (प्रतिनिधी)- खुलताबाद येथील हजरत ख्वाजा जर जरी बक्ष उरूस यात्रेनिमित्त येणाऱ्या भाविकांना आरोग्य, पिण्याचे पाणी, वीज, एसटी बस, स्वच्छतागृहे इ. सुविधांची प्राधान्याने उपलब्धता करून द्यावी,असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी आज दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित उरूस यात्रेच्या पूर्वतयारी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले.

पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, उपविभागीय अधिकारी कन्नड संतोष गोरड, तहसीलदार खुलताबाद संतोष गुट्टे, मुख्याधिकारी समीर शेख, नगराध्यक्ष अमीर पटेल, दर्गा समितीचे अध्यक्ष इजाज अहमद, उपाध्यक्ष इमरान जहागिरदार, सदस्य सचिव कामरान अहमद तसेच इतर सदस्य उपस्थित होते.

जिल्हाधिकारी गौडा यांनी सांगितले की, उरूसासाठी येणाऱ्या भाविकांच्या सोयी-सुविधांसाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही, याची दक्षता घ्यावी.

उरूस कालावधीत वाहनतळ, राहटपाळणे व इतर मनोरंजनाच्या साधनांमुळे गर्दी होणार नाही, यासाठी योग्य नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

यंदा उरूस आणि श्रावण महिना एकाच कालावधीत असल्यामुळे वाहनांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पोलीस प्रशासन आणि प्रादेशिक परिवहन विभागाने वाहतूक व्यवस्थापनावर विशेष लक्ष द्यावे, तसेच खुलताबाद शहरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची संख्या वाढविण्याचे निर्देशही त्यांनी दिले. उरूस काळात तहसील कार्यालय आरोग्य विभाग, अन्न व औषध प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंचायत समिती, महावितरण, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, खुलताबाद नगरपालिका यांनी समन्वयाने काम करुन यात्रा सुरळीत व सुरक्षितपणे पार पाडावी, अशा सूचनाही जिल्हाधिकारी गौडा यांनी दिल्या.

## (पान १ वरून)

### आमच्याकडून विलीनीकरणाच्या...

मात्र, समोरच्या बाजूच्या नेत्यांनी अशी कोणतीही चर्चा झालीच नव्हती असे म्हणत तो दावा फेटाळून लावला. ते ऐकून आम्हाला कुटुंबाला आणि सहकाऱ्यांना प्रचंड दुःख आणि वेदना झाल्या होत्या.''

पुढे बोलताना त्या म्हणाल्या, ''तो प्रस्ताव प्रत्यक्ष माझ्या भावाचा होता. त्यामुळे त्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी आमचे प्रामाणिक प्रयत्न होते. पण जेव्हा मला जाणवले की, समोरचे नेते दादांची इच्छा पूर्ण करण्यास अनुकूल किंवा रास्त नाहीत, तेव्हा आम्ही तो विषय त्याच दिवशी संपवून टाकला. आम्ही अत्यंत स्वाभिमानी लोक आहोत. त्यामुळे आता आम्ही तो विषय मागे सारून पुन्हा एकदा पूर्ण ताकदीने राज्य आणि देशाच्या सेवेसाठी कामाला लागलो आहोत.''

विशेष म्हणजे, दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाबाबत किंवा एकत्रीकरणाबाबत यापूर्वी कोणतीही अंतर्गत बैठक किंवा चर्चा झाली नसल्याचा दावा करणारे खासदार सुनील तटकरे यांनी आज अखेर एक पाऊल मागे घेतले. पत्रकार परिषदेत बोलताना तटकरे यांनी मान्य केले की, अजित पवार हयात असताना दोन्ही पक्ष एकत्र येण्याबाबत प्राथमिक पातळीवर नक्कीच चर्चा झाली होती. तटकरेंच्या या कबुलीनंतर सुप्रिया सुळे यांनी घेतलेल्या आक्रमक आणि तितक्याच भावनिक पवित्र्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात हा विषय पुन्हा एकदा केंद्रस्थानी आला आहे.

### वारीत निधन झाल्यास एक लाखांचं...

घडून काही वारकऱ्यांचा दुर्दैवी मृत्यू होतो. अशा कठीण प्रसंगी गरीब वारकरी कुटुंबाला संकटकाळात आधार मिळावा, या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून संस्थानने हा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

श्री संत तुकाराम महाराज संस्थानने स्पष्ट केले आहे की, हे आर्थिक साह्य थेट मृत वारकऱ्याच्या कायदेशीर वारसाला दिले जाईल. मात्र, सदर आर्थिक सहाय्य मिळवण्यासाठी संस्थानकडून काही नियमांची आणि अटींची पूर्तता करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

### सोनम वांगचुक यांच्या आंदोलनावर...

बैठकीबाबत शिरसाट म्हणाले की, जोपर्यंत उपमुख्यमंत्री किंवा जयंत पाटील स्वतः अधिकृत माहिती देत नाहीत, तोपर्यंत अफवांवर विश्वास ठेवू नये. मात्र, ''पुढील आठ दिवसांत या चर्चांचा सारांश बाहेर येईल. मी केलेली भाकिते नेहमीच खरी ठरतात, त्यामुळे एक आठवडा वाट पाहा,'' असा राजकीय सस्पेन्स त्यांनी कायम ठेवला.

ऑगस्ट महिन्याचा पंधरवडा उलटूनही मराठवाडा कोरडा असल्याने त्यांनी भीषण दुष्काळाची चिंता व्यक्त केली. ''हवामान खात्याच्या अंदाजानुसार २३ तारखेनंतर तुरळक पाऊस पडण्याची शक्यता आहे. भविष्यातील भीषण दुष्काळाच्या शक्यतेवर राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा झाली असून, मुख्यमंत्र्यांनी आतापासूनच उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत,'' अशी माहिती त्यांनी दिली.

### मोदी वांगचुक यांच्या उपोषणाची दखल....

संघाचे स्वयंसेवक होते. चोरी करणारे भाजपशी घनिष्ठ संबंधित होते. चोरी करणाऱ्यांची नियुक्ती देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली. मोदींनीच भूमिपूजन केलं, त्याचं उद्घाटन केलं. नरेंद्र मोदी यांनीच राम मंदिराचा कारभार माहितीच्या अधिकारापासून बाजूला ठेवलं आहे. चोरी झालेली असताना चुप्पी का साधलेली आहे, असा सवाल हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.

सुप्रीम कोर्टाच्या न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली पारदर्शक स्वरुपात राम मंदिर चोरी प्रकरणाची चौकशी व्हावी हा मूळ मुद्दा आहे. या मुद्याला भाजप आणि आरएसएसकडून बगल दिली जात आहे, असं हर्षवर्धन सपकाळ म्हणाले. रामरक्षेच्या निमित्तानं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं आरएसएसला निमंत्रण दिलं आहे. त्यांच्यात धमक आणि खरेपणा असतील तर ते येतील असं हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

शेतकऱ्यांची कर्जमाफी फसवी आहे ते आपल्या सर्वांच्या समोर आलं आहे. समृद्धी महामार्ग करण्यासाठी त्यांच्याकडे पैसे आहेत. लाडकी बहीणचे २१०० रुपये करण्यासाठी त्यांच्याकडे पैसे नाहीत. शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्याकरिता त्यांच्याकडे पैसे नाहीत. दुबार पेरणीला पैसे देण्यासाठी त्यांच्याकडे तरतूद नाही. मात्र, शक्तीपीठ करण्यासाठी त्यांच्याकडे पैसे आहेत, असं हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

### कामासाठी मुख्यमंत्र्यांकडे नाही तर काय...

अर्थ भाजपात जाणार असं नाही. मी जर एकनाथ शिंदेंची भेट घेतली तर त्यांचा अर्थ मी शिवसेनेत जाणार असा काढायची गरज नाही. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि सरकारमध्ये असलेल्या लोकांकडे लोकप्रतिनिधींचे कामे असतात त्यांचा असा अर्थ काढायचा नसतो. जयंत पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्यानंतर सुरू असलेल्या चर्चेवर त्यांनी प्रतिक्रिया देताना असे म्हटले आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, विकासाच्या कामासंदर्भात सत्ताधाऱ्यांची भेट घ्यावी लागते मतदारसंघातील कामासंदर्भात आम्ही काय राज्यपाल आणि चीफ जस्टीसकडे जावे का? विरोधी पक्षातील नेत्यांनी सत्ताधाऱ्यांची भेट घेतली तर त्याचा दुहेरी अर्थ काढू नये. लॉजिकमागे काही लोकांत अस्वस्थता आहेत. कोणाला मंत्रिमंडळात स्थान मिळणार, अर्थ खाते कोणाला देणार यापेक्षा राज्यातील शेतकरी आज संकटात आहे यावर चर्चा करणे गरजेचे आहे.

### संभाजीनगर-इचलकरंजी बसला भीषण...

वेळेत सर्वांना बाहेर काढल्यामुळे मोठा अनर्थ टळला. काही क्षणांचा उशीर झाला असता तर भीषण दुर्घटना घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

बसला नेमकी कशामुळे आग लागली, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणा घटनास्थळी दाखल झाली असून आगीच्या कारणाचा शोध घेण्यासाठी चौकशी सुरू करण्यात आली आहे.

या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी एसटी बस पूर्णपणे जळून खाक झाली आहे. प्रवाशांच्या म्हणण्यानुसार, चालकाचे प्रसंगावधान आणि कारमधील चौघा नागरिकांची वेळेवर दिलेली सूचना यामुळेच अनेकांचे प्राण वाचले.

### सतेज पाटील यांचा महायुती...

खाते अपयशी ठरले आहे. एनसीआरटीच्या अहवालामध्ये याबाबत शेरा मारलेला आहे. गृह खाते कमकुवत असल्याने गुंडांमध्ये एकमेकांवर भर दिवसा गोळीबार करण्यापर्यंत धाडस वाढले आहे. पोलीस आपल्याला हात लावू शकत नाही अशी भावना त्यांच्या वाढलेली आहे, असेही माजी गृह राज्यमंत्री असलेले सतेज पाटील म्हणाले.

शक्तीपीठ हा पूर्णपणे गरज नसलेला महामार्ग आहे. गेले अडीच वर्षे या महामार्गाविरोधात शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू आहे. शक्तीपीठबद्दल विधिमंडळात साधी चर्चा देखील होऊ नये, अशी शासनाची हुकूमशाही भूमिका आहे, असे नमूद करून पाटील म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी विठ्ठलाला साकडे घालतात. पण मग या महामार्गातून शेतकऱ्यांचे नेमके भले कसे होणार हे त्यांनी स्पष्टपणे सांगावे. शक्तिपीठ महामार्ग कायमचा रद्द व्हावा आणि विठूमाऊलीने मुख्यमंत्र्यांना हा महामार्ग रद्द करण्याची सुबुद्धी द्यावी यासाठी विठ्ठलाला साकडे घालणार आहोत. आता हे शासन विठ्ठलाचे तरी ऐकते का हेच पाहावे लागेल, असा टोला पाटील यांनी लगावला.

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मुद्द्यावर बोलताना सतेज पाटील यांनी सरकारच्या हेतूवर शंका उपस्थित केली. ते म्हणाले, एककीडे सरकार सरसकट शेतकऱ्यांची कर्जमाफी जाहीर केल्याचे सांगते, आणि दुसरीकडे मात्र त्यासाठी अनेक जाचक अटी लावल्या जातात. अटी लावायच्या असतील तर त्याला 'सरसकट' कसे म्हणता येईल? या सरकारच्या केवळ घोषणा आणि त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी यात खूप मोठी 'मिसिंग लिंक' आहे.

### मी घरासाठी सून आणायला गेलो होतो,...

आमचीच मुलगी समजा. आम्ही तिला लहानपणापासून मोठं केलं आहे. ती खूप संस्कारी आणि चांगली मुलगी आहे. इतकी खात्री दिल्यानंतर आम्ही हे लग्न ठरवलं. आता परिस्थिती पाहता, त्यांनाही याबाबत माहिती होती का, असा प्रश्न मला पडतो. न्यायव्यवस्थेवर मला भरोसा आहे. याबाबत तपास होईल. लग्न जुळवून देणारे मित्तल कुटुंबही जबाबदार आहे,'' असा आरोप त्यांनी यावेळी केला.

केतन सियासोबत भांडण होत आहेत, याबाबत तुम्हाला काही सांगितले होते का? असे विचारले असता ते म्हणाले की, ''केतन सांगायचा की, कधी-कधी ती नाराज होते, चिडचिड करते. तिचा फोन कायम एंगेज असायचा. आम्हाला वाटायचं की, नवीन नातं आहे, त्यामुळे काही अपेक्षा असतील. आम्ही त्याला समजवायचो की, अजून नवीन आहे, हळूहळू सगळं व्यवस्थित होईल,'' असे केतनचे वडील म्हणाले.

केतन अग्रवालच्या वडिलांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहित न्यायाची मागणी केली आहे. याबाबत विचारले असता ''मी माझी व्यथा पंतप्रधानांकडे व्यक्त केली आहे. माझ्या मुलाची काहीही चूक नसताना त्याच्यासोबत असे घडले. तो चांगला, सुशिक्षित मुलगा होता. त्याच्यावर अन्याय झाला आहे. माझ्या मुलाला लवकरात लवकर न्याय मिळावा, एवढीच माझी प्रार्थना आहे,'' असे त्यांनी सांगितले.

''प्रत्येक बाप एक स्वप्न पाहतो की, आपल्या मुलाचं लग्न व्हावं, त्याचा सुखी संसार व्हावा. त्यामुळे मी आमच्या घरासाठी एक सून आणायला गेलो होतो. पण माझा २६ वर्षांचा मुलगा गेला, माझं दुःख खूप मोठं आहे. जे माझ्या मुलासोबत घडलं, ते कोणासोबतही होऊ नये. सियाने जर एकदा स्पष्टपणे नाही म्हटलं असतं, तर ही घटना घडलीच नसती,'' हे सांगताना केतनच्या वडिलांना अश्रू अनावर झाले. सिया आणि चेतनच्या लग्नाबाबत माहिती होती का? या प्रश्नावर त्यांनी सांगितले की, ''मला याबाबत काहीही माहिती नव्हती. मला जी काही माहिती समजली ती मीडियाच्या माध्यमातूनच समजली आहे, असे त्यांनी म्हटले.

## समर्थनगरात उबाठाचे रामरक्षा आंदोलन

छत्रपती संभाजीनगर दि.१७ (प्रतिनिधी)- अयोध्येतील राम मंदिरात झालेल्या देणगी अपहाराचा चौकशी व्हावी, यासाठी शिवसेनेने राज्यव्यापी रामरक्षा आंदोलन सुरू केले. यानिमित्त बुधवारी श्रीसमर्थ राममंदिर, समर्थनगर येथे महाआरती करण्यात आली. याप्रसंगी रामरक्षा, भीमरूपी स्तोत्र, हनुमान चालिसाचे पठण करण्यात आले. यावेळी शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, शिवसेना उपनेते सुभाष पाटील, सहसंपर्कप्रमुख विजयराव साळवे, माजी महापौर सुदाम सोनवणे, शिक्षक सेनेचे पद्माकर इंगळे, उपजिल्हाप्रमुख हिरालाल सलामपुरे, श्रीरंग आमटे पाटील, विधानसभा संघटक गोपाळ कुलकर्णी, विजय सूर्यवंशी, महिला आघाडी संपर्क संघटक सुनिता आऊलवार, सुनीता देव, जिल्हा संघटक आशा दातार, वंदना कुलकर्णी आदी उपस्थित होते.


**जाहिर प्रकटन**

**औरंगाबाद येथील एस. एम. सरोदे सर, ७वे सह दिवाणी न्यायाधीश, (वरिष्ठ स्तर), औरंगाबाद यांच्या न्यायालयात**

**अर्जदार :** स्वाती पिता सुधाकर निकम प्र. अंबादास शार्दूल
वय ४५ वर्षे, धंदा- नोकरी,
रा. प्लॉट नं. ४६, गल्ली नं. १२,
वीरण गट्ट, एन-२, सिडको, छत्रपती संभाजीनगर
आधार कं. ३६०८८६८०१७०५

//विरुद्ध//

**गैरअर्जदार: महाराष्ट्र शासन, मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद**

**विषय : वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्या अर्थी मयत सुधाकर तुकाराम निकम यांचे दिनांक ९/०८/२०२३ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात खालील नमूद त्यांचे एकमेव वारस राहिले असून, त्यांच्या मागे औरंगाबाद म्युनिसिपल कॉर्पोरेशन क्षेत्रात अधिकार कॉलनी, एन-६, सिडको येथील एल.आय.जी. गाळा क्रमांक २९८ ज्याचे एकुण क्षेत्र ३० चौ. मीटर राहीलेले आहे. त्यांचे कायदेशीर वारस स्वाती पिता सुधाकर निकम प्र. अंबादास शार्दूल असल्याचे त्यांच्या नावाने सदर मिळकत महानगरपालिका अभिलेखात आणि शहर भूमापन कार्यालयाच्या अभिलेखात नामंतर करुन घेण्यासाठी आयुक्त आदले नामांतर करण्याची विनंती केली असता, त्यांनी वारस हक्क प्रमाणपत्राची मागणी केली. सबब वर नमुद वारसदारा व्यतीरीक्त दुसरा इतर कोणताही वारस नाही व तशा तरतुदी अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळणेसाठी महाराष्ट्र शासना मार्फत जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्या विरुद्ध ॲड शेख सज्जाद अहमद (हकी) यांच्या मार्फत ७० अर्ज वारस हक्क प्रमाणपत्र मिळावे या मागणीसाठी मा. एस. एम. सरोदे साहेब, यांच्या न्यायालयात अर्ज क्र. सिव्हील एम.ए.११४२/२६ दाखल केले आहे. वर नमूद अर्जदार ही मयत सुधाकर तुकराम निकम यांचे कायदेशिर वारस असून त्यांच्याशिवाय इतर कोणीही त्यांचे वारस नसल्याचे नमूद केल्या वरुन त्यांनी सदरचा हा दाखला नेला आहे.

जर वर नमूद केल्याप्रमाणे स्वाती पिता सुधाकर निकम प्र. अंबादास शार्दूल या वारस शिवाय इतर कोणीही वारस असेल तर त्यांनी आपली हरकत अथवा, उक्त दावा कोणतेही अधिकार असेल तर त्यांनी संबंधीत कागदपत्रांसह स्वतः किंवा आपल्या वकीला मार्फत सह. दिवाणी न्यायाधीश साहेब (वरिष्ठ स्तर) मा. एस. एम. सरोदे साहेब यांच्या न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत किंवा पुढील तारखेवर किंवा नमुद आज अखेर दाखल करावे. प्रकरणाची सुनावणीची पुढील तारीख २७/०८/२०२६ रोजी आहे. वर नमूद मुदतीनंतर कोणाही तर्फे कोणत्याही प्रकारचा आक्षेप अथवा उत्तर प्राप्त झाला नाही तर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप अथवा उत्तर नसल्याचे गृहीत धरुन पुढील कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

ज्या अर्थी सदरहू जाहीर नोटीसद्वारे न्यायालयाचे बैठकिला सुचित करण्यात येते की, सदरहू जाहीर नोटीसीची संबंधीतावर दि. ३०/०६/२०२६ रोजी किंवा तत्पुर्वी बजावली करून आणाल मा. न्यायालयात सादर करावा. करीता ही जाहीर नोटीस आज दिनांक- १६/०६/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी दिली.

दिनांक
सह दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, औरंगाबाद

**आदेशावरून**
**अधीक्षक न्यायालय,**
**सह दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, ओरंगाबाद**



**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका**
**कार्यकारी अभियंता (इमारत विभाग)**
**जाहिरात**

छत्रपती संभाजी नगर महानगरपालिका अंतर्गत चिकलठाणा येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिडा संकुल उभारणे या प्रकल्पाच्या फेज-१ अंतर्गत साऊथ पेवेलियन इमारत व पोच रस्ता बांधणे या प्रकल्पाचे काम छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेमार्फत प्रगतीपथावर असून प्रकल्पाच्या कामाकरिता काही बाबींची आवश्यकता असल्याने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्यामार्फत कळविण्यात आले असून, सदर बाबींचे दर सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा इतर विभागाच्या दर सूचीमध्ये नसल्याने सदर बाबींचे दर हे प्र. व्यवस्थापन सल्लागार यांनी पुरविलेल्या आवश्यक सूची मधील नमूद निकष यांची पुर्तता करण्या-या या क्षेत्रातील तज्ञ/पुरवठादार/या स्वरूपाचे यापूर्वी काम केल्याचे अनुभव असलेल्या व्यक्ती/संस्था यांचेकडून केवळ अंदाजपत्रक तयार करणे या मर्यादित हेतू करिता दर खुल्या बाजारातून मागविण्यात येत आहेत (आवश्यक बाबींची सूची खाली दिलेला QR code स्कॅन केल्यास उपलब्ध होईल).

त्यास्तव याबाबतीत स्वारस्य धारकांनी आपले संबंधित बाबींचे दर प्रत्यक्ष किंवा अनुज्ञेय मार्गाने किंवा पोस्टाने दि. २१/०७/२०२६ पर्यंत पाठविण्याचे करावे. या दिनांकानंतर प्राप्त होणारे दर विचारात घेतले जाणार नाहीत. कमी दर सादर केले याचा अर्थ कामाच्या निविदेसाठी गृहीत धरणे बंधनकारक राहील अथवा काम मिळाले अशा स्वरूपाचे कोणताही दावा स्वीकारला/विचारात घेतला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरीत**
**संजय कोंबडे**
**शहर अभियंता**
**महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर**



दैनिक लोकविजय **CHANGE OF NAME**

**OLD NAME -** SHAIKH FARUKH SALAUDEEN
**NEW NAME -** SHAIKH FARUKH SALAUDDIN
**ADDRESS-** LOHGAON ,LOHGAON BK, AURANGABAD-431105